आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. २४.०६.२०२४ | अंक नं. ०९७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

होय..आम्ही घेतोय आपल्या डोळ्यांची काळजी..
एकदा अवश्य भेट द्या व खात्री करा
ऑप्टोमेट्रिस्टकडून डोळ्यांची दरवेळ मोफत तपासणी
▪ नंबरचा चष्मा फक्त रु. 299 रुपयात
▪ प्रोग्रेसिव्ह चष्मा फक्त रु. 900 रुपयात
▪ ब्लूकट चष्मा फक्त रु. 500 रुपयात
अहमदनगरचे सुप्रसिध्द
अंजली चष्मावाला
पत्ता : शिवशक्ती कॉम्प्लेक्स, पटेल मेडिकलजवळ, चितळेरोड, अहमदनगर, मो : 8796824353

लखदीदार आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

'वीर गोगादेव मंदिर' अतिक्रमणात दाखवून ताबेमारी करण्याच्या उद्देशाने पाडण्याचा डाव

कारवाई करा अन्यथा उपोषण : भाजपच्या मंदिर बचाव समितीचा पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे इशारा

ताबामारीच्या उद्देशाने वीर गोगादेव मंदिर अतिक्रमणात दाखवून पाडण्याची मागणी करणाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना देताना वसंत लोढा, दीप चव्हाण, बापू ठाणगे, सोमनाथ धिंताणी, बाळासाहेब भुजबळ, सागर शिंदे, नरेश चव्हाण आदी.

नगर – सर्जेपुरा भागात मेहतर समाजाचे जागृत देवस्थान वीर गोगादेव मंदिर आहे. समाजातील भाविक भक्त आणि दानशूर व्यक्तींच्या योगदानातून नुकताच त्याचा मोठा जीर्णोद्धार करण्यात येवून सुशोभीकरण झाले आहे. आता काही समाजकंटक ताबामारी करण्यात एकसपर्ट असलेले गुंड यांनी हे वीर गोगादेव मंदिर अतिक्रमणात आहे, महापालिकेच्या जागेवर बांधण्यात आले आहे, असे खोटे निवेदन देऊन मंदिराचे पावित्र्य भंग करीत आहेत. यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे नगर शहरात ताबामारी करणाऱ्यांच्या गुंडाविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम १५३ (अ) (१) (ब), २९५ (अ), १२० (ब), ३४ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भाजपच्या शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे केली आहे.

सदर प्रकरण अत्यंत गंभीर असून, त्याबाबत अर्ज करणारे व त्यांचा ठेकेदार म्होरक्या यांनी संगमनाताने कटकारस्थान रचून समाजातील शांतता भंग होईल आणि दोन समाजात जातीय तेढ निर्माण करण्याच्या दुष्ट हेतूने महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांना निवेदन देऊन, खोटे तक्रार अर्ज देऊन प्रसिद्धीला दिले आहेत. यामुळे शहरात दहशत पसरवून कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. खाजगी जागेत समाज निधीतून उभारलेले वीर गोगादेव मंदिर सुबक कलाकुसरीने साकारण्यात आले आहे. नगर शहराच्या आध्यात्मिक वैभवात भर घालणारे सुंदर देखणे मंदिर तयार झाले आहे.

हे मंदिर पाडण्याची मागणी करणाऱ्या टोळीचे प्रमुख जे आहेत, त्यांच्या विरोधात जर कोणी गेले तर त्यांना त्रास देण्याच्या हेतूने असे प्रकार शहरात सुरू आहेत. मागील काही महिन्यापूर्वी नगरमधील व्यावसायिक त्यांच्या विरोधात गेले होते, तेव्हा त्यांचे व्यवसाय बंद करून त्यांना त्रास देण्यात आला. त्यावेळी त्यांनी आ. संग्राम जगताप आणि त्यांच्या कार्यकर्त्यांविरोधात आपला तक्रार अर्ज दिला होता.

आठ दिवसांपूर्वी हाजी तकिया ट्रस्टच्या जागेबाबत काही लोकांना उभे करून असेच निवेदन देण्यात आले. जगताप हे त्यांच्या राजकीय विरोधकांचा सूड घेण्यासाठी प्रशासनाला हाताशी धरून त्यांच्या पाठीमागे वेगवेगळे भुंगे लावण्याचा प्रयत्न करतात. असे बरेच गंभीर विषय निर्माण झालेले आहेत.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी शहरातील शांतता आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून दोन समाजात, जाती धर्मात दुहीची बीजे पेरली जात आहेत, हे घातक आहे. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत याचा फायदा घेण्यासाठी राजकारण केले जात आहे. त्यासाठी सत्तेचा गैरवापर केला जात आहे.

जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांनी या घटनेचा सांगोपांग विचार करून निष्कर्ष काढावा. या कुटील राजकीय वृत्तीचा बंदोबस्त करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी. यामुळे शहरात या सर्व गोष्टी थांबतील आणि त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. अन्यथा उपोषण, आंदोलन अशा सनदशीर मार्गाचा अवलंब करावा लागेल. याकडे जर दुर्लक्ष केले तर कायदेशीर मार्गाने सर्व पुराव्यानिशी गृह खात्याकडे या ताबामारी गँगबाबत दाद मागावी लागेल, असा इशारा भाजपच्या मंदिर बचाव कृती समितीचे अध्यक्ष वसंत लोढा, उपाध्यक्ष बापू ठाणगे, सोमनाथ धिंताणी, बाळासाहेब भुजबळ, सागर शिंदे, नरेश चव्हाण यांनी दिला आहे.

महेश सहकारी पतसंस्थेची निवडणूक जाहीर कार्यक्रमानुसार सुरू राहणार

सहकारी संस्थांच्या निवडणूक स्थगिती आदेशात सुधारणा

नगर – राज्य सरकारने पावसाळ्याचे कारण पुढे करत राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३० सप्टेंबरपर्यंत लांबणीवर टाकल्या आहेत. तथापी निवडणुकांना स्थगिती देण्याच्या आदेशात पुन्हा एकदा सुधारणा करत ज्या संस्थांच्या निवडणुका उमेदवारी अर्ज विक्री आणि चिकृती या टप्प्यावर आहेत किंवा त्यापुढच्या टप्प्यावर आहेत अशा संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्यास या सुधारित आदेशाद्वारे परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे पिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक घोषित कार्यक्रमानुसार पूर्ण केली जाणार आहे.

राज्य सरकारने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित करत तीन महिने लांबणीवर टाकल्या होत्या. त्यानुसार या संस्थांच्या निवडणुका आहे त्याच टप्प्यावर ३० मैं पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या होत्या. १ जूनपासून निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यास परवानगी देण्यात आली होती. तथापी पावसाळ्याचे दिवस विचारात घेऊन राज्य सरकारने सहकारी संस्थांच्या निवडणुकांना आहे त्याच टप्प्यावर स्थगिती देत निवडणुका ३० सप्टेंबरपर्यंत लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे. तथापी सदर आदेशात पुन्हा एकदा सुधारणा करण्यात आली असून ज्या संस्थांच्या निवडणुकांचा अर्ज विक्री–चिकृती अथवा त्यापुढील टप्पा चालू आहे अशा संस्थांच्या निवडणुका घेण्यास परवानगी देण्यात आली आहे.

त्यानुसार पिंगारच्या महेश नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक घोषित कार्यक्रमानुसार सुरू राहणार आहे. सध्या या पतसंस्थेचा उमेदवारी अर्ज माघारीचा टप्पा सुरू असून, अर्ज माघारीसाठी २७ जून ही अंतिम मुदत आहे. त्यामुळे या संस्थेच्या संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी होत असलेली निवडणूक नियमित टप्प्यानुसार सुरू राहणार असून, ७ जुलैं रोजी मतदान व मतमोजणी होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अल्ताफ शेख यांनी दिली आहे.

अंगारक संकष्ट चतुर्थी उपवासासाठी स्पेशल
टक्कर
मंगळवार दि.२५ जून बंद्रोदय १०.२७.मी.
काजु- पॅटीस, शाबुदाणा वडा, कैलास उडपी
उपवासाची स्पेशल कैलास लस्सी
शिवसाई अर्पार्टमेंट, खिल गली, पिंपळवाडा, अ.नगर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Murot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

भाडेतत्वावर देणे आहे
लालटाकी रोड अ.नगर येथील
कालिका प्राईड मध्ये
३३० स्क्वे. फुट गाळा
बँक, पतसंस्था, ऑफिस, बँक ऑफिस, क्लिनिक इ. करिता भाडेतत्वावर देणे आहे.
त्वरीत संपर्क
98500 63432

UPGRADE YOUR KITCHEN WITH NEW HOME APPLIANCES
ANYTHING FOR ANYTHING
LIMITED PERIOD OFFER
20% TO 40% OFF ON MEGA EXCHANGE
OPP. GOLD'S TV CENTRE, SAVEDI ROAD, AHMEDNAGAR - 03. PH. : 0241- 2427002
Franchise by DB VENTURES
SONY GIFTS PVT. LTD.

तुझ्या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान !
'रामकृष्ण'चा विद्यार्थी देवांश संजय झंवर
12th Bord 85.17%
(JEE Mains - 99.19%)
JEE Advance Qualified
बेंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स मध्ये प्रवेश मिळाल्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन !
तुझ्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा !
SETH RAMNATH DHOOT AUDITORIUM
SREF
Shri Ramkrishna Education Foundation's
SETH NANDALAL DHOOT ENGLISH MEDIUM SCHOOL & MOHANLAL RAMAUTAR MANDHANA ARTS, COMMERCE & SCIENCE JUNIOR COLLEGE
(SSC/ HSC Board Pattern) (Recognised by Govt. of Maharashtra)
S. No. 27/3, Bhavaninagar, Ahmednagar. Ph. 0241- 2450801

गोल्ड लोन
(सोने तारण कर्ज)
7*% व्याजदर
प्रति १० ग्रॅम 50,000/- कर्ज
त्वरीत कर्ज
एक विश्वास.. एक बांधिलकी...
R रामकृष्ण अर्बन
श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी लि.
मुख्य शाखा : रामकृष्ण भवन, जुनी वसंत टॉकीज, माळीवाडा, अहमदनगर. फोन : – ०२४१ – २३४७३१०
सावेडी शाखा : सोनानगर चौक, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहमदनगर. फोन : – ०२४१ – २३२४८४८

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी
तज्ञ डॉक्टर
डॉ. दिलीप जोंधळे MBBS, MD, M.R.C.P., F.A.C.P.(Indian) अ.न. मेडीसिन
डॉ. अनिल जाधव MBBS, MD अ.न. मेडीसिन
डॉ. मिलिंद कोतडे MD (MEDI), DNB (MED), DMC&RC(ICT), आय.सी.यू. इन्चार्ज
डॉ. प्रदीप कंठाळी MBBS DNB (Gen. Medicine) FCPS (Chdu) अ.न.स. मेडिसिन, न्यूरो वार्ड
डॉ. ऐपेलीन गायकवाड MBBS, Dip. Derm. अ.न.स. त्वचा
डॉ. अतिष सुरासे MBBS, MS (General Surgery) अ.न.स. सर्जरी
डॉ. प्रतीक्षा पवार–पन्हाडे MBBS, MS (Ob-Gy & Gyn) सीनिअर व प्रसूती तज्ञ
डॉ. योगिता होलकर MBBS, MS (Ob & Gyn) सीनिअर व प्रसूती तज्ञ
डॉ. विशाल पाटील MBBS, DOG, DNB (Ophth), DRM, (Retina) सीनिअर, प्रसूती तज्ञ व लेझर विभाग तज्ञ
डॉ. गणेश विलास MBBS DCH, PPC, PGPN Paediatrician & Neonatologist बालरोग तज्ञ
डॉ. मिलन कळके (कोतडे) MBBS, DGMS सर्जन तज्ञ व नवजात शिशु तज्ञ
डॉ. जयश्री गायकवाड MBBS, DGMS सिनेकोलॉजिस्ट
डॉ. इरफ़ान सय्यदकार MBBS, MD Medicine DM Nephro. किडनी विकार तज्ञ
डॉ. आफ़ताब खेड़ MBBS, MD Medicine Fellowship in Nephro. किडनी विकार तज्ञ
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध
मोफत साखर तपासणी
२४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध
ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
कॉलेजची, एल-२, पेशंटची, सीटी स्कॅन, टी ड्रेसिंग, ईसीजी, एन्जीओग्राफी, संपन्न विभाग व इतर सर्व तातडीच्या १०% पर्यंत सवलत
इंडो आयरिश हॉस्पिटल
पत्ता : तपोवन रोड, सावेडी, अहमदनगर.
फोन : 0241–2423336, मो. 9130423336.

११ वे पुण्यस्मरण
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, न्याकुळ करते आमच्या मनाला.. आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
स्व. सौ. पुष्पलता लालचंद चंगेडे
स्व. दि. २५/०६/२०१३
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..
दुःखांकित
शिरीष लालचंद चंगेडे – सौ हर्षलता
कु. ओजल श्रेयस चंगेडे
अमित अरविंद मेहेर–सौ. सुजाता
श्रध्दा शिरीष चंगेडे
श्रेयस शिरीष चंगेडे–सौ.स्नेहा
कु.आरूष श्रेयस चंगेडे
सौ.ललिका प्रेमसुख कटारीया
श्रीमती मीना अरविंद मेहेर । सौ. माला अनिल गांधी । सौ. शैला राजेंद्र कांकरिया
समस्त चंगेडे परिवार
चंगेडे फटाका मार्ट, अ.नगर मो. ९४२२२२५५१४

Back to SCHOOL
10% off For All Stationary Item
आर एन आर्ट अँण्ड क्राफ्ट
गिफ्ट अँण्ड स्कूल स्टेशनरी
होलसेल & रीटेलर
४ वर्षांडे साठी लागणारे विविध प्रकारचे गिफ्ट पॅक करून मिळतील.
मो. ९३२४३२९०६१ / ९३७३४१७११३
काका खवावाला समोर, नेता सुभाष चौक, चितळे रोड, अ.नगर ४१४ ००१

जिल्हातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्मिंद म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य मुंढेचा

email - navamaratha@gmail.com

कसं जगायचं हसत हसत की रडत रडत...

काही लोकांच्या चेहऱ्यावर अशी कायी अवक्का असते की आपल्यालाच अपराध्यासारखं वाटायला लागतं. काय उपयोग असोचा? असा निराशेचा थर या 'काही' लोकांच्या चेहऱ्यावर २४ तास थापलेला असतो. कधीही लेकाचे मनमोकळं हसताही नाही.

या काही लोकांकडे बघून काळजी वाटू लागते. बरं ती असतात चांगल्या खात्यापित्या घरचे. यांना पाऊनसुद्धा आवडत नाही. अवघ्या सृष्टीला नवतरणी बनवणारा पाऊस त्यांना त्रास वाटतो. 'शीः सगळीकडे चिक्चिक्याट नुसता' म्हणून कपडे झटकतील.

हिवाळ्यात यांना शेकोटीचा आस्वाद घेत थंडी भोगता येत नाही. सर्दीनं पिडल्यासारखे नाकाला रुमाल लावून फिरतील! उन्हाळ्यात तर काही विचारच नका. उन्हाचा ताप परवडला परंतु यांचा जळफळाट नको असं वाटायला लागतं. या काही लोकांच्या आयुष्यात आनंदाचा 'वसंतोत्सव' कधी येतच नाही. सदा कदा उदास पानगळ...

जीवनोत्सुक लोकांसाठी वसंत ऋतुसारखा मौसम नाही. परंतु त्यांच्या तावा या काळात चांदणं होऊन येतो. म्हणूनच ठरवा कसं जगायचं? हसत हसत की रडत रडत. या जन्मावर शतदा प्रेम करायचं की वाया घालवायचं. स्वतःसह कुटुंबाच्या, समाजाच्या प्रगतीत, आनंदात सहभाग, सहकार्य करायचं की स्वतःबरोबर त्यांनाही नाउमेद करायचे?

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

खेळाडूंना घडविणारे वाडियापार्क मैदान आणखी किती दिवस ठेवणार अंधारात?

जिल्हाधिकारी यांना सवाल

नगर – या ना त्या कारणांनी वाडिया पार्क मैदान नेहमीच चर्चेचा विषय ठरत आहे अनेक खडतर प्रवासाचा सामना करत खेळाडूंसाठी अहमदनगरचे वाडीया पार्क मैदान मोठ्या थाटामाटात उभे राहिले खरे तर ऐतिहासिक वारसा या मैदानास लाभलेला आहे. हे मैदान अनेक दिवसापासूनचे आहे. या मैदानावर सराव करून अहमदनगरच्या अनेक खेळाडूंनी देशाच्या नकाशावर नाव कोरलेले आहे. अनेक दिग्गज रणजीपटू घडविलेले आहेत. नामांकित असे क्रिकेटचे कपिल देव, सुनील गावस्कर असे खेळाडू अहमदनगरच्या याच मैदानावर खेळले आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून वाडिया पार्क काही ना काही कारणास्तव नेहमीच चर्चेत येत आहे. येथील अधिकाऱ्यांना याचे मात्र काही देणे घेणे दिसत नाही. जलतरण तलावाचा विषय असो वा खेळाडूंना देण्यात येणाऱ्या सुविधांचा विषय असो कधी हॉलीबॉल, बास्केटबॉलचे ग्राउंड विषय असो या सर्वांसाठी क्रीडा कार्यालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधांची वनवा दिसून येत आहे.

वाडिया पार्क मैदानामध्ये अनेक दिवसांपासून दिसे नसून मोबाईल टॉर्चच्या अल्प प्रकाशात खेळाडूंना सराव करण्याची नामुष्की ओढावली आहे. (छाया – अमित मग्गार)

वेगवेगळ्या खेळांना जागेचा वानवा एकाच पोर्ट वर तर तीन तीन खेळांचे प्रशिक्षक प्रशिक्षण देतात, आता तर चक्क ऐन पोलीस भरतीच्या वेळेसच या ठिकाणी सरावासाठी अनेक खेळाडू मोबाईलच्या टॉर्च लाईटमध्ये सराव करत आहेत ही खरच नगरकरांसाठी शर्मेची बाब आहे जिल्हाधिकारी साहेब ! आपणच या मैदानाला एकदा समक्ष भेट देऊन पाहणी करून गेलात तर या मैदानाची खरी परिस्थिती आपल्या निक्षित्त लक्षात येईल या ठिकाणी मैदानाच्या गोलाकार बाजूने लावले ते पथदिवे अनेक दिवसापासून बंद आहेत फक्त आणि फक्त अधिकाऱ्यांच्या इमारतीवरच मैदानाच्या समोरच्या बाजूने दोन दिवे नव्हे टेंभे लावल्यागत आपला जीव ओतून प्रकाश सर्व मैदानावर टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचे या ठिकाणी दिसून येईल. हो पण शर्त एकच असेल ही भेट संध्याकाळी दिली तरच आपणास हे सर्व दिसेल बर का ? या ठिकाणी संध्याकाळी आपण आलात तर सर्व चित्र स्पष्ट होईल. आपण सामितीचे अध्यक्ष आहात या नात्याने खेळाडूंचे भवितव्य घडविणारे वाडीया पार्क मैदान असे किती दिवस अंधारात ठेवणार आहात हा प्रश्न आता मैदानावर येणारे खेळाडू आपणाला विचारत आहेत.

अहमदनगर शहर दहशतमुक्त करण्यासाठी कठोर कारवाई करा, या मागणीचे निवेदन जागरूक नागरिकांच्यावतीने पोलीस अधीक्षक कांना देण्यात आले.

अहमदनगर शहर दहशतमुक्त करण्यासाठी कारवाई करावी; पोलिस अधीक्षकांना निवेदन

नगर – लोकसभा निवडणुकीनंतर गेल्या काही दिवसापासून अहमदनगर शहरात काही जातीयवादी संघटना शहरात जातीय तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे व प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करीत शहरात रस्त्यावर प्रक्षोभक घोषणा देत रॅली काढून कायदा सुव्यवस्था बिघडवण्याच्या हेतुपुरस्सर प्रयत्न होत आहे. धर्मांधतेच्या माध्यमातून द्वेष आणि दहशत निर्माण करण्याच्या प्रकरणातून निष्पाप व्यक्तीला मारून गंभीर जखमी करण्यात आले आहे.

शहरात अचानक उद्ध्मवलेल्या या प्रकरणात काही राजकीय मंडळी आपल्या पोळ्या भाजून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न करीत असून शहरात दंगल घडवण्याचे रीतसर नियोजन होत असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन सूत्रधारांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या मागणीसाठी जागरूक नागरिकांच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस उपनिरीक्षक नागेश पाटक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अशोक संब्बन, संजय खामकर, भैरनाथ वाकळे, संध्याताई मेढे, अर्शद शेख, विक्रम क्षीरसागर, अॅड. विद्या शिंदे, फयाज शेख केबलवाला, शमस खान, सय्यद सलीम, शकील खान, सय्यद अल्फेक आदी उपस्थित होते.

नगर व केडगावमध्ये दोघांच्या गळफास घेवून आत्महत्या

नगर – नगर शहरात माणिक चौक परिसरात २९ वर्षीय तरुणाने तर केडगाव उपनगरात भूषणनगर परिसरात ३४ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. या दोन्ही घटनांबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्युच्या नोंदी करण्यात आल्या आहेत.

माणिक चौक येथे गुदड सुखनाथ नाथ याने शुक्रवारी (दि.२१) रात्री ८ च्या सुमारास घरात दरवाजाच्या अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. त्याला नातेवाईकांने उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले होते. मात्र त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. याबाबतची खबर डॉ. खेडकर यांनी पोलिसांना दिली. कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

आत्महत्येची दुसरी घटना केडगाव उपनगरात भूषणनगर परिसरात माधवनगर येथे रविवारी (दि.२३) दुपारी घडली. येथे हर्षल भगवानराव जोशी याने राहत्या घरात गळफास घेतला. त्याला त्याचा मित्र मुकुंद बोरकर याने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. खेडकर यांनी त्यास उपचारापूर्वी मयत घोषित केले. याबाबतची खबर डॉ. खेडकर यांनी पोलिसांनी दिली. कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या दोन्ही आत्महत्यांचा तपास पो.हे.कॉ. आनंद दाणी हे करत आहेत.

वाढदिवसानिमित्त नेत्रतज्ज्ञ डॉ. ऋषी पाटील यांनी बुध हॉस्पिटल परिसरात वृक्षारोपणसाठी भेट केले अनेक झाडे.

ऊसाचे थकित पेमेंट न दिल्याने 'कुकडी'च्या चेअरमन, संचालकांच्या मालमत्ता जप्ती व लिलावाचे आदेश

नगर – श्रीगोंदा येथील कर्मयोगी कुंडलिकराव जगताप कुकडी सहकारी साखर कारखान्याने ऊस शेतकऱ्याचे थकवलेले २१ कोटी ३ लाख ५० हजार रुपये न दिल्यांने राज्याचे साखर आयुक्त यांनी या कारखान्याची जंगम व स्थावर मालमत्ता जप्त करून तसेच कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळाची राज्यातील व राज्य बाहेरील मालमत्ता जप्त करून, तिची विक्री करून शेतकरी, कामगार व बँकांची देणे द्यावीत असा आदेश नुकताच काढलेला आहे. यासाठी थकीत शेतकरी बांधवातर्फे अॅड. बाळासाहेब पवार यांनी कामकाज पाहिलेले आहे. त्यांनी केलेला उपयुक्त पाठपुरावा तसेच युक्तिवाद, कागदपत्रे दाखल करून वरीलप्रमाणे आदेश पारीत करून घेतलेला आहे.

विजेच्या खांबावरून पडून खाजगी वायरमनचा मृत्यू

नगर – बल्ब बसविण्यासाठी विजेच्या खांबावर चढलेला असताना तोल गेल्याने खांबावरून खाली पडून गंभीर जखमी झालेल्या खाजगी वायरमनचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील केतकी, निंबोडी गावच्या परिसरात घडली आहे. सुनील रमेश साठे (वय २९, रा. केतकी, निंबोडी, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.

मयत वायरमन साठे हा गावातील विजेच्या खांबावर बल्ब बसविण्यासाठी शनिवारी (दि.२२) दुपारी १२ च्या सुमारास चढला होता. मात्र बल्ब बसवत असताना त्याचा तोल गेल्याने तो उंचावरून खाली जमिनीवर पडला. त्याच्या डोक्याला मार लागून तो गंभीर जखमी झाला.

त्याला परिसरातील नागरिकांनी उपचारासाठी नगर शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरु असताना रविवारी पहाटे २.३५ च्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या प्रकरणी भिंगार कम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अजित मेहेर यांचे हृदयविकाराने निधन

नगर – शेवगाव येथील रहिवासी किराणा मालाचे व्यापारी अजित शांतीलाल मेहेर (वय ५४) यांचे २२ जून रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर शेवगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात २ मुली, १ मुलगा, जावई असा परिवार आहे.

नितीन मारवाडी यांचे हृदयविकाराने निधन

नगर – बोरुडे मळा, बालिकाश्रम रोड येथील रहिवाशी नितीन विठ्ठलराव मारवाडी (वय ५०) यांचे २३ जून रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर सिद्धेश्वर स्मशानभूमी, पैठण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक भाऊ, पुतणे असा परिवार आहे. सुनिल मारवाडी यांचे ते छोटे बंधू होत.

दत्तात्रय हारदे यांचे दुःखद निधन

नगर – गुलमोहर रोड, सावेडी, सध्या रा. रांजनखोल येथील रहिवाशी दत्तात्रय हारदे (वय ६५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. सेवानिवृत्त कृषी अधिकारी व प्रगतशील शेतकरी होते. त्यांच्या पश्चात पत्नी जयश्री, एक मुलगा अविनाश, दोन मुली मनोरमा व रुपाली आहेत. सेवानिवृत्त शिक्षक रामचंद्र हारदे व सेवानिवृत्त शिक्षिका सुशिला म्हसे यांचे ते लहान बंधू होत. त्यांचा महिपती महाराज पंढरी वारीत उत्सवात सहभाग असायचा.

'काळाराम' व हिंदू मंदिरांमध्ये अनुसूचित जातीतील नागरिकांना व शूद्रांना दर्शनास प्रवेश बंदीचा निषेध

जातीय तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींवर कारवाई करा; समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – नाशिक येथील काळाराम मंदिर तसेच हिंदू मंदिरांमध्ये अनुसूचित जातीतील नागरिकांना व शूद्रांना दर्शनास प्रवेश बंदी करण्यात यावी असे वादग्रस्त व जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना करून सामाजिक वातावरण दूषित करण्याचा प्रकार एका समाजकंटकाने केला आहे. तो अतिशय निंदनीय प्रकार असून अहमदनगर जिल्ह्यातील समस्त आंबेडकरी चळवळीतील समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी अशोकराव गायकवाड, सुरेश बनसोडे, सुनेध गायकवाड, अजय साळवे, सुनील क्षेत्रे, योगेश साळे, रोहित आव्हाड, नगरसेवक राहुल कांबळे, संजय खामकर, प्रमोद आढाव, आप्पासाहेब मकासरे, नितीन कसबेकर, गौतमी ताई भिंगारदिवे, प्रा. प्रमोद सूर्यवंशी, संजय साळवे, श्याम यादव, शेखर पंचमुख, अंकुश मोहिते, येशुदास वाघमारे, किशोर उल्हारे, सतीश साळवे, अण्णासाहेब गायकवाड, आदित्य भिंगारदिवे, जयेश गायकवाड, विक्रास केदारे, प्रमोद गायकवाड, अनिकेत साळवे, विजय भिंगारदिवे, स्वराज भिंगारदिवे, कौशल गायकवाड, सुरेश भिंगारदिवे, यादव भिंगारदिवे, विशाल भिंगारदिवे, अविनाश राशे, निलेश बांगरे, आकाश जाधव, दीपक सरोदे, सिद्धेश आठवले, नवीन भिंगारदिवे, अण्णासाहेब गायकवाड, राम गायकवाड, विशाल गायकवाड, निखिल साळवे, गणेश गायकवाड, विनीत पाडळे, विजय गायकवाड, विशाल गायकवाड, सिद्धांत गायकवाड, प्रतिक सोनवणे, अक्षय बोरुडे, संघराज गायकवाड, अनिकेत गायकवाड, शिवम झेंडे, संकेत बारस्कर, सिद्धार्थ पवार, अजय घाटीसावी, दीपक पाटोळे, लक्ष्मण माघाडे आदीसह आंबेडकर समाजबांधव उपस्थित होते.

जातीय तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींवर कारवाई करा, या मागणीचे निवेदन समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

हा घडलेला प्रकार निंदनीय असून वादग्रस्त वक्तव्य व जातीय तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये समस्त आंबेडकर समाज हा मतदानाविषयी निर्णय घेणार असल्याचे सांगितले, सर्वांनी तीव्र स्वरूपात आपल्या भावना व्यक्त केल्या. आंबेडकरी चळवळीतल समाजाच्या वतीने अनुसूचित जातीमधील जनतेच्या वतीने तीव्र शब्दात जाहीर निषेध करून त्या समाजकंटकावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

घरफोडी करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना 'एलसीबी'ने पकडले

चोरीतील १ लाख ५ हजाराचे सोने, १० हजारांची रोकड केली हस्तगत

नगर – चांदबीबी महालाजवळ नगर तालुक्यातील जांब गावच्या शिवारात शेतकऱ्याचे घर भरदिवसा फोडून ५ लाख ७३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोकड चोरून नेणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्याकडून चोरीतील १ लाख ५ हजाराचे सोने, १० हजारांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे.

जांब येथील दत्तात्रय आसाराम पवार हे कुटूंबियांसह घराचे पाठीमागील शेतात काम करत असताना चोरट्यांनी त्याचे घर फोडून चोरी केली होती. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना दिले होते. त्यानुसार पो. नि. आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अंमलदार भाऊसाहेब काळे, रविंद्र कर्डीले, मनोहर गोसावी, देवेंद्र शेलार, संदीप दरंदले, विजय ठोंबरे, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, विशाल तनपुरे, मेघराज कोल्हे व अरुण मोरे यांचे पथक नेमून तपास सुरु केला. पो. नि.आहेर यांना रविवारी गोपनीय माहिती मिळाली की सदर गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी तुषार हबाजी भोसले व कानिफ उध्दव काळे (दोन्ही रा. आष्टी, जिल्हा बीड) यांनी केला असून ते चोरी केलेले सोने विक्री करण्यासाठी मुद्दी चौक, नगर-जामखेड रोड येथे थेथार आहे, अशी माहिती मिळाल्याने. पो.नि. आहेर यांनी तत्काळ कारवाई साठी पथक पाठविले. या पथकाने सापळा लावुन दोघांना पकडले. त्यांची अंगझडती घेता त्यांच्याकडे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण व १० हजारांची रोकड असा १ लाख १५ हजारांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी तो ताब्यात घेवून विचारपूस केली असता सदर मुद्देमाल हा जांब येथून चोरल्याची कबुली त्यांनी दिली.

आरोपी तुषार भोसले हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द नगर जिल्हात दरोडा, जबरी चोरी व घरफोडी असे गंभीर स्वरुपाचे एकुण २३ गुन्हे दाखल आहेत. तर आरोपी कानिफ काळे याचे विरुद्ध नगर व बीड जिल्हात दरोडा तयारी, दरोडा व खुन असे गंभीर स्वरुपाचे एकुण ३ गुन्हे दाखल आहेत.

डॉक्टर दाम्पत्याचे घर फोडून चोरी

सावेडी उपनगरातील घटना; साडेसहा तोळे दागिने व रोकड लंपास

नगर – ड्युटीसाठी हॉस्पिटलमध्ये गेलेल्या डॉक्टर दाम्पत्याचे घर फोडून चोरट्यांनी सुमारे साडेसहा तोळ्यांचे सोन्याचे दागिने, १० हजारांची रोकड असा १ लाख ३१ हजारांचा ऐवज चोरून नेला. सावेडी उपनगरातील मिस्किननगर, गंगादर्शन येथे ही घटना घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत डॉ. नितीन विठ्ठलराव साळुंके (वय ५७) यांनी फिर्याद दिली आहे. ते व त्यांच्या पत्नी विदुला साळुंके शहरातील एका खासगी रुग्णालयात नोकरी करतात. दोघे शुक्रवारी (दि.२१) दुपारी अडीच वाजता ड्युटीसाठी हॉस्पिटलमध्ये गेले होते. जाताना त्यांनी घराच्या आतील दरवाजाला आतून कडी लावून मेन दरवाजाला कुलूप लावले होते. तसेच मेन गेट ओढून घेतले होते. त्यानंतर घरफोडीचा गुन्हा खिडकीचे ग्रिल कापून लाकडी शिडी उभी करून आत प्रवेश केला. कपाटाचे लॉक तोडून १२ ग्रॅमची सोन्याची चेन, एक तोळ्याच्या दोन सोन्याच्या चेन, एक तोळ्याच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, तीन ग्रॅमचा ओम, दोन तोळे नऊ ग्रॅमची सोन्याची बांगडी व ९० हजारांची रोकड असा ९लाख ३१ हजारचा ऐवज चोरून नेला.

दरम्यान डॉक्टर साळुंके दाम्पत्य रात्री ११ वाजता घरी आले असता त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.२२) दुपारी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि.कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक शुभांगी मोरे करत आहेत.

गृहिणी

आरोग्य

गुडघेदुखीमध्ये तिळाचे तेल लाभदायक

तुमचे गुडघे दुखत असल्यास तिळाचे तेल सकाळ-संध्याकाळ थोडे थोडे प्या. त्यावर कोमट पाणी प्या. १५ दिवसांत गुडघेदुखी थांबण्यास मदत होईल.

हे सर्व उपाय घेतुगी जरी असले तरी तुम्हाला काही शरीरसंबंधी त्रास किंवा आजार असेल तर सर्वात आधी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

पाककला

तिळाची पापडी

साहित्य – तीळ एक कप, साखर एक कप, तुप एकटेबल-स्पून.

कृती – सर्वप्रथम तीळ मंद आचेवर भाजून घ्यावे. कढईत साखर वितळेपर्यंत हलवत राहावे.

पाक तयार झाल्यानंतर त्यात थंड झालेली तीळ घालून घ्यावी. ताटाला तूप लावून तयार मिश्रण ताटात ओतून लाटण्याच्या साहाय्याने पातळ पापडी लाटून घ्यावी. कुकीज कटर साह्याने गोलाकार पापडी कट करा. अशाप्रकारे तयार तिळाची पापडी हवाबंद डब्यात भरून ठेवावे.

सौंदर्य

सुंदर केसांसाठी

* कडुलिंबाची पाने व बोरांची पाने वाटून केसांना लावा. काही दिवसात केस लांब व सुंदर होतील.
* तेलकट त्वचेवरील डाग घालवण्यासाठी चंदनाचे चूर्ण गुलाबपाण्यात मिसळून लावा. हा प्रयोग उन्हाळ्यात जास्त उपयुक्त असतो.
* पपईचा गर चेहऱ्यासाठी 'फेस पॅक' करून वापरा. चेहरा विलक्षण आकर्षक होतो.
* गरोदरपणात स्ट्रेचमार्क्स तराय होतात. त्यावर ऑलिव्ह आईल लावावे.

सल्ला

मटकीची उसळ उरल्यास दुसऱ्या दिवशी ती मिक्सरमधून बारीक करून घ्यावी. लसूण, मिरची, जिरे, ओवा आणि थोडेसे ज्वारीचे पीठ घालावे. उकडलेला बटाटा घालावा. कोथिंबीर घालून सर्व गोळा चांगला मळून घ्यावा. कटलेट तयार करून भाजणीवर किंवा ब्रेडच्या चुऱ्यावर घोळवून तव्यावर दोन्ही बाजूंनी तेल सोडून बदामी रंगावर फ्राय करावीत.

वास्तू

घरातील देवघराला कळस, गोमुखासारखा आकार किंवा झेंडा लावलेला नसावा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २५ जून २०२४

अंगारक चतुर्थी, शके १९४६ क्रोधीनाम संवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, श्रवण १४।३३

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य-

मेष : आजचा दिवस कठोर परिश्रम करण्यात जाईल. आजची संध्याकाळ मित्रांबरोबर व्यतित कराल. अडकलेला पैसा मिळेल. भूमि, घर विकत घेण्याचे योग. भाग्यवर्धक यश.

वृषभ : मानसिक सुखशांती मिळेल. कामाच्या ठिकाणी प्रसन्न वातावरण राहील. कुटुंबाकडून सहयोग मिळेल. आरोग्यात सुधारणा. आर्थिक स्थितित बचत आणि निवेशाचे योग येतील. विषयावर वाद संभव आहे. सामाजिक कामात सक्रिय भागीदारी.

मिथुन : प्रवासासाठी दिवस उत्तम आहे व परिष्ठांशी संपर्क आपल्यासाठी आनंद देणारा ठरेल. मनोरंजनासाठी वायफळ खर्च होईल. लाभदायी करार होतील. मानसिक शांति मिळेल. आर्थिक स्थितित सुधारणा. स्वजनांशी भेट घडेल.

कर्क : व्यस्त रहाल. मनोरंजनासाठी काही प्लॅन कराल. व्यापार-व्यवसायिकांना दिवस संमिश्र. शत्रूंपासून दूर राहा. आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. आर्थिक स्थिति सुदृढ राहील. यश वाढेल.

सिंह : काळ अनुकूल आहे काम सहज होतील. राजकारणी लोकांचा पाठिंबा मिळेल. मन उल्हासित होईल. कर्मक्षेत्रात गूढ अनुसंधाना संबंधी विशेष योग. आर्थिक क्षेत्रात अनुसंधान संबंधी योग.

कन्या : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. काही प्रश्नांची सोडवणूक सर्वांना एकत्र आणून करावी लागेल. व्यापारात नवीन लाभदायी करार होतील.

तूळ : कामाचा भार अधिक राहील. जोखमीची कामे टाळा. महत्वाचे काम टाळा. कोर्टुबिक सभासदांशी वादविवाद टाळा. तब्बेत सांभाळा. आर्थिक लाभ. शब्दाने शब्द वाढवू नका.

वृश्चिक : एखाद्याच्या सहयोगाने कार्ये पूर्ण होतील. जोडीदाराबरोबर घालवलेली वेळ सुखद राहील. देवाण-घेवाण टाळा. मित्रांचा सहयोग मिळेल. गुंतवणूक विचारपूर्वक करा. मित्रांबरोबर वेळ जाईल. नवे संबंध बनतील.

धनु : आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. इतरांना सहकार्य केल्याने वाद उद्‌भवू शकतात. आर्थिक उन्नति होईल. परिस्थिति शांतपणे हाताळा. आर्थिक प्रकरणात विशेष अनुसंधान योग. घरात मंगल कार्य होतील.

मकर : एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. राहत्या जागेसंबंधी अडचण राहू शकते. मिळकतीतून लाभ प्राप्ति योग. शासकीय स्त्रोतांकडून धन प्राप्तिचा योग. पैश्यासंबंधी वाद सोडविण्यासाठी भाग्यवर्धक यश प्राप्ति योग.

कुंभ : प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. घरात मंगल कार्याचा योग. दृढ निश्चयामुळे कामात विजय मिळेल. मित्रांचा सहयोग मिळेल. आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे.

मीन : आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. लाभदायक बातमी कळेल. धनलाभ होईल. विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९५२ सौ.शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :- १) चर्चासत्र ५) चार रस्ते एकत्र येतात ते ठिकाण ६) मनोरंजन ७) अतिशयपणा; जास्तीतजास्त ९) बरोबर; सोबत ११) अरण्य; जंगल; रान १२) महिना; माह १४) एक कीटक; मक्षिका १५) नटूनथटून गावभर हिंडणारा एक राग १५) निषध देशाचा राजा १६) खिडकी; वातायन; झरोका १७) गरीब; प्रामाणिक २०) थंड; शीतल पथ: २३) डोके; मस्तक

उभे शब्द :- १) बिल्हा; सन्मान म्हणून दिला जाणारा बिल्हा २) गोळा करणे; जमविणे ३) आठवडयातील कोणताही दिवस ४) नगाऱ्याचा मोठा दुमदुम असा आवाज ५) जिज्ञासू; शोधक ८) आईची बहीण १०) उपस्थित १३) पोरका नसलेला; नवरा असलेली १४) गायनातील एक राग १५) निषध देशाचा राजा १६) खिडकी; वातायन; झरोका १७) गरीब; प्रामाणिक २०) थंड; शीतल पथ: २३) डोके; मस्तक

शब्दगंध क्र. ६९५१ चे उत्तर

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : पुस्तके म्हणजे समयरूपी सागरात उभे केलेले दीपस्तंभ होत.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

पृथ्वीचा परीघ किती आहे?

या प्रश्नाचं उत्तर देण्याआधी आपल्याला आपली पृथ्वी एखाद्या चेंडूसारखी गोल, गरगरीत, वेटोळी आहे हे गृहीत धरायला हवं. वास्तवात ती तशी नाही. दोन्ही ध्रुवांच्या इथं ती जराशी दबल्यासारखी आहे. उलट विषुववृत्ताच्या ठिकाणी ती जराशी फुगल्यासारखी आहे. स्वतःभोवती सतत ती गरगर फिरत असते, त्यामुळे तिच्या आकारात हा फरक झालेला आहे. तरीही तिचा परीघ किती आहे हे समजून घेण्यासाठी आपण, ती गोल गरगरीत आहे, असं समजल्यास फारसा फरक पडणार नाही.

आता परीघ म्हणजे कोणत्याही एका ठिकाणाहून आपण पृथ्वीच्या पृष्ठभागाला धरून सरळ प्रवास करत निघालो तर परत त्याच ठिकाणावर पोहोचेपर्यंत आपण किती मजल मारली असेल, याचं गणित आहे. तेव्हा अशा प्रवासासाठी असलेल्या साधनांवरूनच आपण या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न करू शकतो.

पूर्वीच्या काळी समुद्रावर प्रवास करणाऱ्या नावाड्यांना आपण कुठं आहोत, कुठं चाललो आहोत हे समजण्यासाठी फारशी साधनं नव्हती. त्यामुळे आकाशातल्या ग्रहगोलांनाच विचारत त्यांची वाटचाल होत असे. उत्तर गोलार्धात ध्रुव तारा उत्तर दिशा दाखवत असे. त्याच्यानुसार मग इतर दिशा ओळखल्या जात. तसंच आपण किती मजल मारली आहे, हे समजण्यासाठीही अशाच गणिताची मदत घेतली जात असे. त्यातूनच नॉटिकल माईल म्हणजेच 'नौकानयनातला मैल' ही संकल्पना पुढं आली. याचंच संक्षिप्तीकरण होऊन 'नॉट' हे एकक रूढ झालं आहे. त्यामुळे जहाजांचा वेग हा दर ताशी अमुक इतके नॉट असा मोजला जातो.

जमिनीवरून प्रवास करत असतानाही आपण मैल हे अंतर मोजण्याचे एक एकक पाळतो; पण नॉटिकल माईल आणि आपल्या नेहमीच्या ओळखीचा मैल यांच्यात फरक आहे, कारण त्या एककांची व्याख्याच वेगळी आहे.

पृथ्वी गोलाकार असल्यामुळे त्या गोलाचे ३६० अंश संभवतात. या वर्तुळापैकी एक मिनिटाची आर्क म्हणजे एक नॉटिकल माईल अशी त्याची व्याख्या केली गेली आहे. म्हणजेच या वर्तुळाच्या एक अंशाच्या एक-साठांश इतक्या भागाचा प्रवास केल्यास एक नॉटिकल माईल अंतर कापले जाते. तेव्हा संपूर्ण ३६० अंशांचा प्रवास करायचा झाल्यास ६०x३६० म्हणजेच २१६०० नॉटिकल माईल इतके अंतर होते; पण एक नॉटिकल मैल हा आपल्या जमिनीवरच्या मैलापेक्षा मोठा असल्यामुळे हेच अंतर २४८५७ मैल किंवा ४०००३ किलोमीटर इतकं भरते.

ठकास महाठक

एका गावात एक व्यापारी राहत होता. व्यापारात त्याने बरीच कमाई केली होती. एकदा त्याच्या मनात आले, खूप धन कमावले, आता चारीधाम यात्रा करुन आल्यास तेवढेच पुण्य पदरी पडेल. असा विचार करुन आपल्याजवळ असलेल्या मापसाकडे सोन्याच्या मोहोरा असलेली घागर सांभाळण्यासाठी देत म्हणाला,

''मित्रा, मी काही दिवस यात्रेला निघालो आहे. चोरांचे भय असल्याने माझी ही सोन्याच्या मोहरा असलेली घागर तुझ्याकडे ठेव. मी लवकर परत येईन, तेव्हा मला परत कर.'' असे म्हणून तो यात्रेला गेला.

काही दिवसांनी यात्रा करुन तो व्यापारी परत आपल्या गावी आला आणि मित्राकडे जाऊन आपली सोन्याच्या मोहोरा ठेवलेली घागर मागू लागला. तेव्हा तो लबाड मित्र म्हणाला,

''अरे काय सांगू मित्रा, ''तू गेल्यापासून उंदरांनी मला नकोसे करुन सोडले बघ. त्या पलीकडच्या वातीवर उंदरांनी येऊन तुझी सोन्याच्या मोहोरा असलेली घागर केव्हा खाऊन टाकली, याचा मला पत्तासुद्धा लागला नाही.''

त्यावर व्यापारी म्हणाला,'' मित्रा, असे जगावेगळे उंदीर आजपर्यंत मी कधी ऐकले वा पाहिले नव्हते. बरं, असू दे.'' असे म्हणत तो आपल्या बिऱ्हाडी पोहोचला.

दुसऱ्या दिवशी त्याचा मित्र बोंब करत त्याच्या घरी येऊन म्हणाला, ''अरे मित्रा, मी पुरता बरबाद झालो रे. माझा एकुलता एक मुलगा कोणी तरी पळवून नेला रे. आता मी काय करु? असे म्हणत तो रडू लागला. त्यावर व्यापारी मित्र म्हणाला, ''अरे असे म्हणतोस? मग बरोबर. अरे आज सकाळीच एक ससाणा एक पोराला उचलून नेताना मी पाहिला बघ. मला तर वाटते, तो तुझाच मुलगा असणार.'' त्यावर मित्र म्हणाला, ''

हे काय भलतेच, एवढासा ससाणा एवढ्या मोठ्या मुलाला उचलून नेणे कधी शक्य आहे काय? त्यावर व्यापारी म्हणाला,'' अरे भाऊ, ज्या गावचे उंदीर सोन्याच्या मोहोरा खातात, त्याच गावचा ससाणा मुलाला उचलून नेतो, यात आश्चर्य ते कुठले? तेव्हा मित्र मनात काय समजायचे, ते समजला. तो घरी गेला व मोहोरा भरलेली घागर घेऊन व्यापारी मित्राकडे आला आणि ती त्याला परत करताच व्यापारी मित्रानेही त्याचा पळवून आणलेला मुलगा परत केला.

तात्पर्य : नाक दाबले की तोंड उघडते.

जीवन चक्र

काही लोक फक्त ठराविक लोकांना खुष,संतुष्ट करण्याकरीताच मेहनत घेतात असे लोक आपल्या अधिकाऱ्यास, श्रीमंतांना वा ज्यांच्याकडून त्यांना काही भेट मिळणार असेल त्यांनाच आपले सर्वोत्तम देवू शकतात. परंतु गरीबांकरीता वा ज्यांच्या जवळ देण्यासाठी काही नाही अशा लोकांकरीता जे सर्वोत्तम करतात, जे सर्वांशी एक सारखेच वागतात, ते लोक महान आहेत.

आणखी एक संदेश (उपदेश) आहे की जेव्हा आम्ही काही कार्य करतो अशावेळी आम्हांला असे वाटते की, यामुळे काही ठराविकच लोक फायदा घेत आहेत वा काही निवडकच लोक त्या कार्याची प्रशंसा करीत आहेत. तेव्हा आम्ही निराश होऊ नये. असे म्हटले गेले आहे की जरी आम्ही एखाद्याही व्यक्तिच्या जीवनामध्ये बदल घडवून आणू शकलो तर आमचे जीवन जगण्यालायक आहे. आम्ही जेव्हा काही प्रयत्न करतो आणि जरी अपेक्षेप्रमाणे तेथे गर्दी गोळा झाली नाही, तरीही आम्ही इतरांकरीता मग एक असो की दोन असो आम्ही त्यांची मदत करतो. आम्ही कधीही असा विचार करू नये की आम्ही काही करण्याची योजना बनविली होती परंतु त्याचा लाभ अत्यंत अल्प लोकांना होत आहे यास्तव ही योजना करणे योग्य नाही. आम्ही त्या लोकांच्या जीवनामध्ये एक बदल घडवून आणित आहोत तिचा लाभ थोडेच घेतील तर हे त्या लोकांकरीता महत्त्वपूर्ण आहे. आम्ही निराश होऊन आपले प्रयत्न सोडू नये. संगीतकारांनी थोडघाच लोकांसमोर आपल्या कलेचे प्रदर्शन केले. परंतु त्यामध्ये एक 'बादशहा' होता.

आम्ही जे काही करतो त्यास प्रभु बघतो. आम्ही नेहमी आपल्यातील सर्वोत्तम करावे. सेवेच्या फळात बक्षीस नसून ते सेवा करण्यात आहे. आम्ही जर आशाप्रकारे जीवन जगलो तर आम्ही दरशेज झोपते वेळी संतुष्ट, समाधानी राहू. आम्हांस अंतरी आनंद आणि प्रसन्नतेचे वरदान मिळेल. जे सर्वांना आपले सर्वोत्तम दिल्याने मिळते.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

परमात्मा से सारी शक्तियाँ पवित्रता, शान्ति, प्रेम, सुख, आनंद की किरणें पूरे खेती में किरणों के रूप में फैल रही हैं... । पौधे शान्ति, प्रेम, आनंद का अनुभव कर रहे हैं.... । अनाज में सात्विकता, पौष्टिकता बढ़ रही है... । इस खेती में कोई भी जंगली जानवर, पशु-पंछी आदि फसल को नुकसान करने वाली कीट इत्यादि की प्रवेशता नहीं होगी। यह शुद्ध सात्विक अन्न जो भी खायेगा उसका तन निरोगी और मन शक्तिशाली बनेगा...। परमात्मा के कार्य में सहयोगी बनने के लिये प्रकृति के पाँचों तत्वों को धन्यवाद देता हूँ... । प्रतिदिन ऐसे सकारात्मक संकल्प करने से मनोबल बढ़ता है, समाधान मिलता है। अत: अन्त में मैं सभी कृषको को यह सन्देश देना चाहता हूँ कि आप सभी परमात्मा पिता की याद में रहकर यह यौगिक खेती करने का प्रयास करें क्योंकि इस यथार्थ और वास्तविक विधि से खेती करने से ही आपकी खेती सुजलाम् सुफलाम् होगी।

१७ अगस्त, २००८ में ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय में साप्ताहिक कोर्स करने के बाद मैं यहाँ का नियमित विद्यार्थी बन गया। राजयोग का अभ्यास करने से जीवन में बहुत खुशियाँ और उमंग-उत्साह बढ़ने लगा। अगस्त, २००९ में कुमारों की भट्ठी में मेरा मधुबन आना हुआ।

इसी बीच, शाश्वत यौगिक खेती पुस्तिका प्राप्त हुई जिससे प्रेरणा लेते हुए, सन् २००९ से ही हमने अपने खेती में शाश्वत यौगिक पद्धति से खेती करना शुरू किया। सबसे पहले जून, २००९ से हमने ६ एकड़ में से २ एकड़ में हरी खाद (ताग वा लैंचा) की बुआई की। उसे ६० दिन के बाद काटकर जमीन में गाड़ दिया, जिसका सेन्द्रिय खाद जमीन में तैयार हुआ। फिर नवम्बर से उसी प्लॉट में २ एकड़ खेती में गन्ना लगाया, समय प्रति समय आने वाली अन्य अनावश्यक घास निकालकर प्लॉट को स्वच्छ रखते गये। घर में सभी सदस्य सहयोगी होने कारण रोज मुरली क्लास होता है और घर खेती के बीच में है। तो सवेरे की क्लास के बाद बाबा द्वारा जो भी शिक्षायें सुनते, उन्हीं श्रेष्ठ सकारात्मक चिंतन के साथ खेती में काम करते हैं जिससे सकारात्मक विचारों का प्रभाव वायुमण्डल को शक्तिशाली बनाता है। परिणाम-स्वरुप इस खेती के गन्ने से जो गुड बनाया उसमें यह अनुभव किया कि रासायनिक खादों के इस्तेमाल की तुलना में इसका उत्पादन ज्यादा मिला ।

(प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

चंप्या : बाबा, मला गाडी घेऊन द्या.

वडील : देवानं दोन पाय कशाला दिलेत!

चंप्या : एक किक् मारायला, न् एक गिअर बदलायला.

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



हे तर धरतीचे अश्रू आहेत
जे अंधाराहतही तिला हसत ठेवतात

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

उपचारादरम्यान आजाराचे नेमके कारण शोधावे लागते. मूत्राशय व गर्भाशय खाली घसरले असेल तर शस्त्रक्रियेद्वारे स्त्रीचा आजार बरा होतो. रजोनिवृत्तीनंतर मूत्रवह संस्थेचे विकार उद्‌भवले असतील तर इस्ट्रोजनयुक्त गोळ्या, मलम यांच्या वापराने हा त्रास कमी होऊ शकतो. मूत्रमार्गाचे तोंड आकुंचन पावले असेल तर अशा वेळी त्याचे रुंदीकरण करून वारंवार लघवीला जाण्याचा त्रास कमी होऊ शकतो. गर्भाशयाबरोबर मूत्राशयाचे स्नायूबंध शिथील झाल्यामुळे त्रास होत असेल तर योगासने, सहजोली म्हणजेच मूत्रद्वार व योनिमार्ग यांचे आकुंचन प्रसरण करणे यासारख्या व्यायामाने त्रास कमी होऊ शकतो. आयुर्वेदिक उपचारांनी स्त्रीचा त्रास कायमचा कमी होतो. मानसिक दडपणाने नकळत लघवी होत असेल, तर ध्यानधारणा, ओंकार, दीर्घ श्वसन, प्राणायाम या योगसाधनेने हार्मोन्सचे प्रमाण संतुलित होऊन मनावरील दडपण कमी होते. तसेच ॲलोपॅथिक उपचारांमध्ये Derifenacin, Fluoxate या औषधांनी नकळत होणाऱ्या लघवीवर ताबा मिळवता येतो.

लघवीची जळजळ कमी करण्यासाठी पुनर्नवा गोखुर, लाजालू, चंदन यांनी युक्त सिरप वापरावे. रुग्णानुभव – ३२ वर्षांची एक स्त्री नकळत लघवी होते, लघवीवर ताबा राहात नाही ही तक्रार घेऊन आली होती. तिच्या अनेक तक्रारी होत्या व प्रसूतीच्या वेळेस तिला त्रास झाला होता, असे तिने सांगितले. एकूणच तिच्या बोलण्यावरून तिचा स्वभाव टेन्शन घेण्याचा वाटला. तपासणीअंती लक्षात आले, की थोडे खोकले तरी तिला आपोआप लघवी होत होती. सारखी अंतर्वस्त्रे बदलादी लागत असल्याने शेवटी ती डायपर पॅड वापरायला लागली. या त्रासाला वैतागून तिने विचारले, 'मॅडम, माझी या त्रासातून सुटका होईल का? मी बरेच उपचार केले, परंतु अजूनही माझा त्रास कमी झाला नाही.' मूत्रमार्ग व गर्भाशय यांना आधार देणाऱ्या स्नायूंना शिथीलता आल्यामुळे तिचा लघवीवरचा ताबा कमी झाला होता. तिला दर आठवडाभाला एक याप्रमाणे दीड महिना उत्तरबस्ती घेण्यास सांगितली. अपानवायूच्या विकृतीमुळे व स्नायूबंध शिथील झाल्यामुळे तिला त्रास होत होता.

(क्रमश:)

– डॉ. शारदा निर्मल-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

वधू-वर कार्यालय ही काळाची गरज

किशोर डागवाले यांचे प्रतिपादन

नगर – प्रत्येक समाजात वधू-वरांचे लग्न जमविणे ही मोठी समस्या भेडसावत आहे. सकल माळी समाज ट्रस्टने समाजाची गरज लक्षात घेऊन माळी वधू वर नांदणी कार्यालय सुरू केले आहे. वधू वर सूचक कार्यालय ही काळाची गरज आहे. या कार्यक्रमासाठी मोठया संख्येने उपस्थित राहून समाजाने पाठबळ दिले आहे. सकल माळी समाज ट्रस्ट ला एक वर्ष पूर्ण झाले आहे. समाजाने जे उद्दिष्ट ठरविले होते त्याची मुहूर्तमेढ माळी वधू वर सूचक नोंदणी कार्यालयाच्या उद्घाटनाने सुरू झाली आहे. समाजातील सेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी युवकांची आघाडी तसेच महिला भगिनींना एकत्र करून महिला आघाडीचे संघटन करुन त्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. सकल माळी समाजाच्या सर्व कार्यकर्त्यांनी पदाला महत्व न देता एकत्रितपणे येऊन समाज कार्य करावे, असे प्रतिपादन सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

नवीन टिळक रोड येथील पडोळे चाळ येथे सकल माळी समाज ट्रस्ट संचलित माळी वधू वर सूचक नोंदणी कार्यालयाचे उद्घाटन श्री विशाल गणेश देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

याप्रसंगी सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बालासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, शरद झोडगे, बालासाहेब बोराटे, भगवान फुलसौंदर, अनिल बोरुडे, प्रा.माणिक विधाते, धनंजय जाधव, मंगलाताई लोखंडे, सुवर्णाताई जाधव, प्रयागताई लोंढे, बाजार समितीचे संचालक संतोष म्हस्के, माळी वधू वर सूचक मंडळाचे अध्यक्ष अशोक हिंगे, उपाध्यक्ष भास्कर चौधरी, सचिव प्रा.अनुरीता झगडे, डॉ.रणजीत सत्रे, विनोद पुंड, मच्छिंद्र बनकर, अनिल इवळे, अमोल भांबरकर, पोपट शिंदे, सुरेश आंबेकर, संजय गारुडकर, पंचम पडोळे, कॅप्टन सुधीर पुंड, निवृत्त कर्नल डॉ. सोमेश्वर गायकवाड, डॉ.दामोदर कळमकर, डॉ.संजय विधाते, डॉ.संजय गठो, कैलास गाडीलकर, राजेंद्र झोडगे, अशोक आगरकर, राजु खरपुडे, बालासाहेब आगरकर, नीळकंठ विधाते, सुदाम बोरुडे, सुनील गुलदगड, अँड.राहुल रासकर, अँड.अनिल गाडेकर, अँड.निर्मला चौधरी, रुक्मिणीबाई पडोळे, वंदना पडोळे, रोहिणी बनकर, रेखा विधाते, रेणुका पुंड, सुरेखा घोलप, गजानन सस्ताणे, नितीन भुतारे, शामराव व्यवहारे, रोहित पठारे, लवेश गोंधळे, चंद्रकांत पुंड, साहेबराव विधाते, गणेश कोल्हे, नारायण इवळे, निलेश चिपाडे, गोरख पडोळे, शेखर व्यवहारे, कैलास सुडके, राजेंद्र एकाडे, भानुदास बनकर, बालासाहेब बेलेकर, सुधाकर कानडे, रामदास फुले, संभाजी चौधरी, सुरेश कावळे, मनोज भुजबळ, संजय कानडे, देविदास खामकर, नीळकंठ विधाते, सुदाम बोरुडे, सुरेश रासकर, वैभव सुडके, शरद दातरंगे, उमेश शिंदे, गणेश औसरकर, बाबासाहेब सस्ताने, नितीन डागवाले, संजय ताजणे, दत्तात्रय पानमळकर, सागर खरपुडे, सुरेश शेलार, भाऊसाहेब धाडगे आदी उपस्थित होते.

प्रा.माणिक विधाते म्हणाले, वधू वर सूचक कार्यालयाच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सुटतील. तसेच समाज हिताच्या दृष्टीने सकल माळी समाज ट्रस्ट ने चांगले काम सुरु केले आहे.

बालासाहेब बोराटे म्हणाले, सकल माळी समाज ट्रस्ट सुरू झाल्यापासून समाज हिताच्या दृष्टीने सर्व कार्यकर्ते एकत्रितपणे येऊन समाजाला हातभार लावण्याचे कार्य करीत आहेत. माळी वधू वर कार्यालय सुरू केल्याने समाजात चांगले काम उभे राहील. असा विश्वास नांदणी कार्यालयाचे व्यक्त केला. शरद झोडगे म्हणाले, वधू-वर नोंदणी कार्यालया ची सुरुवात करुन सकल माळी समाजाने चांगला पायंडा पाडला आहे.

उंजय गारुडकर म्हणाले, वधू-वरांचे लग्न जमविताना प्रत्येक समाजाला अडचणी निर्माण झालेल्या आहेत. सावेडी, केडगाव, बालिकाश्रम रोड, मिंगार, सावित्रीबाई फुलेनगर, नागरदेवळे, नेप्ती, शेंडी या उपनगराताही वधुवर सुचक कार्यालयाच्या शाखा सुरू कराव्यात.

मच्छिंद्र बनकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी माळी समाज बांधव व भगिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन चेतन गायकवाड यांनी केले. तर आभार प्रा.अनुरीता झगडे यांनी मानले.

नवीन टिळक रोड येथील पडोळे चाळ येथे सकल माळी समाज ट्रस्ट संचलित माळी वधू वर सूचक नोंदणी कार्यालयाचे उद्घाटन श्री विशाल गणेश देवस्थानचे महंत संगमनाथजी महाराज यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. याप्रसंगी सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बालासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे आदींसह समाज बांधव.

सकल माळी समाजाच्या वधू वर सूचक नोंदणी कार्यालयाचा उद्घाटन सोहळा

पंकजाताई मुंडे यांच्या राजकीय पुर्नवसनासाठी अहिल्यानगर शहरातील ओबीसी समाज व मुंडे समर्थकांनी निर्मलनगर येथील भगवान बाबांच्या मंदिरात महाआरती करुन साकडे घातले. याप्रसंगी भिमराज आव्हाड, कैलास गर्जे, राहुल सांगळे, वैभव ढाकणे आदिंसह ओबीसी बांधव. (छाया – विजय मते)

पंकजाताई मुंडेंच्या राजकीय पुर्नवसनासाठी भगवान बाबांची महाआरती करुन साकडं

नगर – ओबीसी समाजाच्या पंकजाताई मुंडे यांच्या राजकीय पुर्नवसनासाठी अहिल्यानगर शहरातील ओबीसी समाज व मुंडे समर्थकांनी सावेडी उपनगरातील निर्मलनगर येथील भगवान बाबांच्या मंदिरात महाआरती करुन साकडे घातले.

यावेळी ओबीसी समाज बांधव उपस्थित होते. सकल ओबीसी समाज हा पंकजाताईंना मानणारा आहे. त्यांचा पराभव सर्वांच्या जिव्हारी लागला आहे. त्यांचे लवकर लवकर राजकीय पुर्नवसन करतांना राज्यसभेवर नियुक्ती करुन मंत्रीपद द्यावे, अशी एकमुखी मागणी भगवानबाबांच्या मंदिरात महाआरती प्रसंगी कार्यकर्त्यांनी केली.

भगवान बाबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष भिमराज आव्हाड म्हणाले, पंकजाताईची लोकप्रियता, ओबीसी समाजासाठी त्यांचे कार्य पाहता निवडणूकीत निसटता पराभव झाला, तो इतका जिव्हारी लागला की कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रेमापोटी स्वतःची जीवनयात्रा संपविली हे दुःखदायक आहे. कायकर्त्यांच्या आत्महत्याचे सत्र थांबविण्यासाठी त्यांचे लवकरात लवकर राजकीय पुर्नवसन करा, अशी मागणी केली.

कैलास गर्जे म्हणाले, पंकजाताई यांच्या सन्मानासाठी भगवान बाबांना महाआरती करुन साकडे घातले. ताईंचे दरवेळेस खच्चीकरण केले जाते. पंकजाताईचे पुर्नवर्सन झाले नाही तर ओबीसी समाज वेगळा विचार करुन पुढील निवडणुकीत ताकद दाखवून देईल, असा इशारा दिला.

यावेळी राहूल सांगळे, वैभव ढाकणे, नितीन शेलार, रमेश सानप, बंटी ढासपे, बबन नांगरे, भैय्या घुले, कुमार बांगर, अतुल गिते, सिताराम पालवे, गिरू गिते, शिरसाठ सर, आव्हाड सर तसेच सकल ओबीसी बांधव उपस्थित होते.

द लाईट सिनेमाच्या स्पेशल स्क्रीनिंगला भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याचे प्रशिक्षक द्रोणाचार्य पुरस्कार विजेते प्रशिक्षक दिनेश लाड व अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांची उपस्थिती. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यादारे आयोजित द लाईट सिनेमाचे स्पेशल स्क्रीनिंग भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याचे प्रशिक्षक द्रोणाचार्य पुरस्कार विजेते प्रशिक्षक दिनेश लाड व अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अरिहन मुक्त ए २ सिनेमा सांताक्रुझ येथे पार पडले. यावेळी बी के कमलेश दीदी, बी के शिखा दीदी, बी के नीता दीदी, बी के डॉ दीपक हल्के आदी.

योग-प्राणायामाने मनाची एकग्रता निर्माण होते : प्राचार्या वैशाली धोंगडे

विश्वभारती अभियांत्रिकीमध्ये योग दिन साजरा

नगर – शरीर, मन आणि आत्मा यांना जोडणारे विज्ञान म्हणजे योग होय. यासाठी नियमित योग करुन आपले शरीर तंदुरुस्ती ठेवले पाहिजे. आता योगाला जागतिक महत्वही प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांनी नियमित योग-प्राणायाम केल्यास मनाची एकाग्रता निर्माण होऊन अभ्यासातही त्याचे चांगले परिणाम दिसतात. महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असतात. आजच्या योग दिनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्व पटवून दिले आहे. दरवर्षी योग दिन उत्साहात साजरा केला जातो, असे प्राचार्या वैशाली धोंगडे यांनी सांगितले.

जामखेड रोडवरील विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयात योगदिनी साजरा करण्यात आला. याप्रसंगी योग शिक्षक प्रा.संदिप गुंदेचा यांनी उपस्थितांना योगाचे धडे दिले. यावेळी प्राचार्या वैशाली धोंगडे आदिंसह शिक्षकवृंद व विद्यार्थी सहभागी झाले होते.

याप्रसंगी योग शिक्षक प्रा.संदिप गुंदेचा यांनी ध्यान-धारणा आणि योग केल्याने मनुष्यामध्ये अंतरिक बदल होतात. त्यातून मन:शांती मिळत आपल्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडतात. यासाठी नियमित साधना करणे आवश्यक आहे. असे सांगून चक्रध्यानाचे प्रशिक्षण देऊन त्याचे फायदे सांगितले.

सूत्रसंचालन प्रा.मृणालिनी चोपडे यांनी केले. यावेळी शिक्षक-कर्मचारी, विद्यार्थ्यांनी उत्साहात यात सहभागी झाले होते.

जामखेड रोडवरील विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयात योगदिनी प्रा.संदिप गुंदेचा यांनी उपस्थितांना योगाचे धडे दिले. यावेळी प्राचार्या वैशाली धोंगडे आदिंसह शिक्षकवृंद व विद्यार्थी.

ई पॅसिंजर व ई कार्गो रिक्षांचे 'जीत बजाज मोटर्स' मध्ये अनावरण

नगर – पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीकोनाने हरित उपक्रमाचा भाग म्हणून बाजारपेठेत दाखल झालेल्या बजाज आर ई पॅसिंजर व ई कार्गो या रिक्षांचे नगर-छत्रपती संभाजी महाराज महामार्ग, शेंडी येथील जीत बजाज मोटर्स शोरुममध्ये अनावरण भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले.

परवान्याची गरज नसलेल्या व अल्पखर्चात चालणाऱ्या या इलेक्ट्रिक रिक्षाच्या प्रथम ग्राहकांना वितरण करण्यात आले. यावेळी जनक आहुजा, इंद्रजीत नय्यर, जतीन आहुजा, शोरुमचे संचालक अभिमन्यू नय्यर, राजीव बिंद्रा, सेल्स मॅनेजर प्रकाश पठारे, सागर पवार, आम्रिदी सय्यद आदी उपस्थित होते.

अक्षय कर्डिले म्हणाले की, वाहनांचे वाढते प्रदूषण पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत वाढ होत असून, पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीकोनाने इलेक्ट्रिक व्हीकल सर्वोत्तम पर्याय ठरत आहे. पेट्रोल, डिजेलचे दरही मोठ्या प्रमाणात वाढत असताना पैश्याची बचत म्हणून इलेक्ट्रिक व्हीकलला नागरिकांची देखील पसंती मिळत आहे.

बजाजने प्रवासी व मालवाहूसाठी बाजारात आणलेली रिक्षा परवान्याची करणारी रिक्षा ठरत आहे. या वाहनांना परवान्याची गरज नसून. सर्व्हिसिंग, पेट्रोल, डिझेल, गॅसचा मोठा खर्च वाचणार आहे. रिक्षासाठी ५ वर्षांची वॉरंटी कंपनीने दिली असल्याची माहिती अभिमन्यू नय्यर यांनी दिली. पाहुण्यांचे स्वागत इंद्रजीत नय्यर यांनी केले. इलेक्ट्रिक रिक्षाचे प्रथम ग्राहक राजेंद्र माने व अशोक मुळे यांना या रिक्षांचे वितरण करण्यात आले.

जीत बजाज शोरुमने बजाजच्या रिक्षांचे विक्रमी खप केला आहे. तर चेतक बजाज इलेक्ट्रिक स्कूटरची डीलरशिप देखील कॅन्टोन्मेंट वनविभाग यांनी मिळाली असून, नगर-पुणे महामार्ग येथील सक्कर चौकात लवकरच नवीन शोरुम नगरकरांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती शोरुमच्या वतीने देण्यात आली.

जीत बजाज मोटर्स शोरुममध्ये ई-पॅसेंजर व ई कार्गो रिक्षाचे अनावरण व वितरण करताना भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले. समवेत जनक आहुजा, इंद्रजीत नय्यर, जतीन आहुजा, अभिमन्यू नय्यर, राजीव बिंद्रा, प्रकाश पठारे, सागर पवार, आम्रिदी सय्यद आदी.

गरज नसल्याने मोठा खर्च देखील वाचणार असून, पर्यावरणाच्या दृष्टीने देखील हितावे ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

बजाज आर ई पॅसिंजर रिक्षा एका चार्जमध्ये १७८ किलोमीटर पर्यंत चालते. तर दुसरी मालवाहू असलेली ई कार्गो १८० किलोमीटर पर्यंत चालते. एका चार्जसाठी ५० रुपये खर्च येतो. पेट्रोल, डिजेलच्या तुलनेत ही सर्वांना परवडणारी व बचत गरज नसलेली वाहने आहे.

हिंद सेवा मंडळाला सहकार्य करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

नगर – आगामी काळामध्ये शैक्षणिक अडीअडचणी व प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी हिंद सेवा मंडळाला निश्चित्च सर्व प्रकारचे सहकार्य करू असे ठोस आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शनिवारी लोणी येथे आले असता पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी व जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा यांनी त्यांची भेट घेवून संस्थेच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले.

यावेळी हिंद सेवा मंडळाच्या विविध शाखां मधील काही अंशत: अनुदानित तत्त्वावरील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे अनुदान प्रस्ताव तसेच शालाथं आयडी, अर्धवेळ नियुक्ती मान्यता प्रस्ताव, रात्र प्रशालेतील शिक्षकांना नियमानुसार शंभर टक्के अनुदानित शाळांवर नियुक्ती प्रस्ताव, अकोले तालुक्यातील ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा २०१० पासून अनुदानापासून वंचित असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

संस्थेच्या सर्व प्रश्नांवर खास बाब म्हणून लक्ष देण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य करून सर्वतोपरी सहकार्य करू असेही आश्वासीत केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हिंद सेवा मंडळाच्या विविध मागण्यांचे निवेदन संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी व जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा.

केडगाव येथील शाही जामा मस्जिदच्या वतीने डीएसपी ऑफिस अहमदनगर येथून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावरून सेवानिवृत्त झाल्याबद्दल जनाब दिलावर गुलाबभाई इनामदार एफ सीआय गोडाऊन येथून सेवावृत्त झालेले शब्बीरभाई देशमुख तसेच इयत्ता दहावी, बारावीतील व सिव्हिल इंजिनियर मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. (छाया. समीर मन्यार)

केडगाव येथील शाही जामा मस्जिदच्यावतीने सेवानिवृत्त कर्मचारी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

नगर – केडगाव येथील शाही जामा मस्जिदच्या वतीने जातीय सुलोख्याबरोबरच नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. डीएसपी ऑफिस अहमदनगर येथून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालेले केडगावचे रहिवासी शब्बीरभाई इनामदार एफ सीआय गोडाऊन येथून सेवावृत्त झालेले शब्बीरभाई देशमुख तसेच इयत्ता दहावी, बारावीतील व सिव्हिल इंजिनियर मधील गुणवंत विद्यार्थी होसला अफजाई, जुबेर नूरमहंमद पठाण, काशीफ नजीर पीरजादे, हिबा जावेद पठाण, सना वसीम पठाण, हुमेरा अकबर पठाण यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मौलाना आझाद रजा, हाफीज अश्रफ रजा, बॉक्सिंग कोच शब्बीर शिकिलकर, हाजी अकबर पठाण, हाजी उस्मानगनी मनियार, नजीर पीरजादे, रफिक शेख, जावेद पठाण, जाकीर पठाण, आबिद खान, फरहान शिकिलकर, राजीक मन्यार, मोहम्मद अली मन्यार, आदिस्नह मस्जिद चे ट्रस्टी उपस्थित होते.

यावेळी सत्कारला उत्तर देताना श्री. इनामदार म्हणाले की वयाच्या ५८ वर्षे सेवा करून अहमदनगर येथून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालो आहे. कोतवाली, तोफखाना पोलीस स्टेशन, महामार्ग, राज्य राखीव पोलीस जिल्हा विशेष शाखा येथे विविध पदावर काम केले माझे सकल समाजाशी केडगावचे रहिवासी शब्बीरभाई देशमुख केडगाव येथील एफसीआय गोडाऊन मधून सेवानिवृत्त झाले आहेत. आमचा सेवानिवृत्तीबद्दल केडगाव जामा मस्जिदच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला व गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप म्हणून त्यांचाही सन्मान करण्यात आला याबद्दल मी सर्वांच्या वतीने त्यांचे आभार मानत असल्याचे ते म्हणाले.

विधवांना दिली जाते मदत व युवकांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

जमात-ए-इस्लामी हिंदचे नगरमध्ये उपक्रम

नगर – रमजान काळात जमा होणारी जकात व दानशूर लोकांनी दिलेल्या देणगीतून नगरमधील ७२ विधवा महिलांना दर महिन्याला दोन हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते तसेच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या सर्वधर्मीय विद्यार्थ्यांना अभ्यासिका व तज्ञांचे मार्गदर्शन नियमितपणे उपलब्ध करुन दिले जाते. नगरच्या जमाते इस्लामी हिंद संस्थेचे हे कार्य विविध सामाजिक संस्थांना दिशादर्शक मानले जात आहे.

एप्रिल १९४८ मध्ये स्थापन झालेल्या जमाते इस्लामी हिंद या संस्थेला १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्त रविवारी मशीद परिचय उपक्रम येथील कासिमखानी मशिदीत घेण्यात आला. ही पाचशे वर्षांपूर्वी स्थापन झालेली ऐतिहासिक वास्तू आहे. येथे झालेल्या मशीद परिचय कार्यक्रमात जमाते इस्लामी हिंदचे स्थानिक अध्यक्ष प्रा. शेख मुस्ताक उमेर यांच्यासह मुस्ताक पठाण, डॉ. इकराम खान काटेवाला, मुस्तफीन पठाण, नदीम शेख, मुबीन खान आदींनी कासिम खानी मशीद व जमाते इस्लामी हिंदच्या नगर शाखेद्वारे राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी पत्रकार रामदास ढमाले यांच्यासह श्रीराम जोशी, नितीन पोटलाशेल, मोहिनीराज लहाडे, विठ्ठल लांडगे, बबन मेहेत्रे, गणेश देलमाडे, दीपक कांबळे, रामदास बेढे, समीर मन्यार, बबलू शेख, रवी कदम, गोरक्षनाथ बांदल आदी उपस्थित होते.

अध्यक्ष, आंतरधर्मीय समजूतदारपणा, संशोधन आणि शिक्षण, सामाजिक विकास, धोरणात्मक मुद्दे, मूल्य आधारित राजकारण, न्यायाधारीत अर्थव्यवस्था आदीसंदर्भात जमाते इस्लामी हिंदद्वारे विविध उपक्रम राबवले जातात.

विधवा महिलांना उपजीविकेसाठी आर्थिक मदत, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या व वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासिका व त्यासाठीची आवश्यक पुस्तके तसेच तज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते. रमजान मध्ये २०० वर गरीब कुटुंबांना रेशनकिट, गुजरातच्या भूकंपपीडित आपदग्रस्तांना आवश्यक साहित्य व आर्थिक मदतही दिली आहे. याशिवाय ताभिळनाडूतील पूरग्रस्तांनाही मदत पोहोचवली गेली आहे. शिक्षण व वैद्यकीय मदत गरजवंतांपर्यंत पोहोचवणे आणि सरकारद्वारे गरिबांसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवणे आदी उपक्रम येथे राबविले जातात, असे यावेळी सांगण्यात आले.

प्रारंभी मौलाना मोहम्मद अरीफ यांनी पवित्र कुराण पठण केले. मशिद परिचय उपक्रमाचे पत्रकारांनी कौतुक केले व समाजातील सर्व घटकांसाठी असे उपक्रम दिशादर्शक असल्याचे आवर्जून सांगितले.

अकारण भीती व अपरिचितपणा

समाजामध्ये एकमेकांविषयी अकारण भीती व अपरिचितपणा वाढल्याने काहीसे अविश्वासाचे वातावरण दिसत आहे. मात्र, प्रत्येक धर्म मानवी नैतिक मूल्यांची शिकवण देतो. त्याचे पालन प्रत्येक नागरिकांनी केले पाहिजे, असे आव्हान डॉ. इकराम खान काटेवाला यांनी यावेळी केले. मशीद ही ईश्वरासमोर नतमस्तक होण्याची जागा आहे, त्यामुळे तिच्याविषयी गैरसमज न बाळगता ती पाण्याप्रमाणे निर्दुंधा बोलावले जावे तसेच संक्रात-दिवाळीसारख्या सणात मुस्लिमांना सहभागी करवून घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. अशा उपक्रमातून सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

हिमालय, पारस, स्लास्टो व सिंटेक्स
या कंपन्यांचे १०० लिटर ते १००० लिटर पर्यंतच्या टाक्या १० वर्ष गॅरंटीसह


प्रो.प्र. सुनिल कलकर पा.
मे. अभय सेल्स
कॉर्पोरेशन अँड हार्डवेअर
सर्वोदय सर्कलची समोर, गजानन इंफ्रास्टक्चर शेजारी, सातपाई नाका, विझीपेठ, अ.नगर.
९८७५७९९९९, ९६२२५४२०११

प्रत्येक नळाला मरपूर पाणी
घरगुती वापरासाठी योग्य क्षमतेचे दर्जेदार पंप

जागतिक संगीत दिनानिमित्त पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय सोलो गीत गायन स्पर्धेमध्ये टॉप टेन नगरच्या गायकांचा डंका

नगर – जागतिक संगीत दिनानिमित्त अण्णाभाऊ साठे ऑडिटोरियम येरवडा पुणे येथे राज्यस्तरीय सोलो गायन स्पर्धा रूपक कला मंच, पुणे यांच्या वतीने अध्यक्ष हर्षद रुपवते यांच्या सहकार्याने २१ जून रोजी आयोजित करण्यात आली होती, त्यामध्ये महाराष्ट्रातील एकूण १०७ स्पर्धक गायकांनी भाग घेतला होता. त्यापैकी अनेक जण संगीत विशारद आणि उत्तम गाणारे होते, त्यामुळे अंतिम निवड करताना खूपच बारकाईने व इंडियन आयडॉल प्रोटो पध्दतीने करावी लागली. त्यानुसार पुण्याचा प्रशांत राठोड याने प्रथम क्रमांक पटकावला तर पुण्याचीच रिया मंच्यू द्वितीय आणि वाई येथील प्रसाद उलांडे तृतीय विजेते ठरले.

छायाचित्रामध्ये प्रमुख परीक्षक, संगीत समीक्षक सुहासभाई मुळे टॉप टेन मधील अहमदनगर येथील विजेते आसावरी पंचमुख, किरण खोडे, विद्या तन्वर, सागर शेळके, राजेंद्र शहाणे इत्यादी.

एकूण नऊ तास अव्याहतपणे चाललेले या स्पर्धेमधून महाराष्ट्रातून प्रत्येक जिल्ह्यामधून एकुण १०७ स्पर्धकांमधून विजेते टॉप २० जे निवडले गेले त्यामध्ये अहमदनगरचाच झेंडा उंच राहिला.

टॉप २० साती अहमदनगर मधील चांगले गायक रामदास गव्हाणे, संतोष पानसरे, प्रशांत छजलानी, साकूण सलणे, निलेश गाडेकर, डॉ. शैलेंद्र खंडागळे, डॉ. विवेकानंद कंगे, राजू क्षेत्रे, मुख्तार शेख यांनी देखील उत्कृष्ट सादरीकरण करून धडक मारली.

१) किरण खोडे २) विद्या तन्वर ३) आसावरी पंचमुख ४)सागर शेळके ५) राजेंद्र शहाणे यांनी ती फेरी पार करून टॉप टेन मध्ये स्थान मिळवले. आणि अंतिम निवडीसाठी त्यानंतर अंतिम फेरीमधे महाराष्ट्रातील टॉप १० मध्ये स्थान मिळवून अहमदनगरच्या १) किरण खोडे २) विद्या तन्वर ३) आसावरी पंचमुख यांनी स्थान मिळवले.

या सर्वांना संगीत समीक्षक सुहासभाई मुळे यांच्याकडून लाभलेल्या सरावाचा व मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून घेऊन त्यांनी खूप छान अपूक व दर्जेदार परफॉर्मन्स दिला व विजेते ठरले.

महाराष्ट्रातून आलेले अनेक गायक स्पर्धक तुल्यबल व संगीत विशारद्ही असल्यामुळे अतिशय चढाओढीची आणि टॉप तेन निवडीसाठी अवघड अशी ही स्पर्धा होती. तरी देखील अंतिम फेरीमध्ये रंगमंचावर परीक्षकांकडून अचानक दिल्ले गेलेले मराठी व हिंदी गाणे टूँक वर आणि संगीत शिवाय अनल्लव सादर करून दाखवणे, अवघड होते. तरीदेखील महाराष्ट्रातील स्वर जिल्ह्यांमधून आलेल्या स्पर्धकांमध्ये टॉप टेन मध्ये नगरचे सर्वाधिक स्थान मिळवून बाजी मारली त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन होत आहे.

स्पर्धेचे प्रमुख परीक्षक म्हणून सुहासभाई मुळे, यांनी मोलाचे मार्गदर्शन केले त्यांना अन्य दोन परीक्षक गायिका गीतांजली देऊळगावकर आणि महाराष्ट्राची लोकधारा मधील गायिका सुनिता राजे निंबाळकर यांनी सहकार्य केले.

यावेळी सुहासभाई मुळे यांनी लवकरच अहमदनगरमधे महाराष्ट्र आयडॉल ही स्पर्धा ६ ऑक्टोबर रोजी उषा मंगेशकर, अनुराधा पौडवाल, सलिल कुलकर्णी, श्रीधर फडके व अजय अतुल यांच्या उपस्थितीत नियोजित असल्याचे जाहीर केले.

कार्यक्रमाला पुणे मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष महाराष्ट्राची लोकधारा फेम शंकरराव मोरे, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, सुनीता राजे निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अहमदाबाद येथे रिझर्व्ह बँक आयोजित संमेलनात मर्चंटस् को-ऑप. बँकेच्या प्रतिनिधींचा सहभाग

नगर – रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या डिपार्टमेंट ऑफ सुपरविजन यांच्या वतीने गव्हर्नरस् इन अर्बन को. ऑप. बँक या विषयावर अहमदाबाद (गुजरात) येथे विशेष संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात नगर जिल्ह्यातून एकमेव अहमदनगर मर्चंटस् को ऑप.बँकेला आमंत्रित करण्यात आले होते.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी या संमेलनात मार्गदर्शन केले. मर्चंटस् बँकेच्यावतीने व्हा. चेअरमन अमित मुथा, संचालक किशोर गांधी, किशोर मुनोत, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक यांनी संमेलनात सहभाग घेतला.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्याशी संवाद

रिझर्व्ह बँकेने आयोजित संमेलनात रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्याशी संवाद साधताना मर्चन्ट्स् बँकेचे व्हा.चेअरमन अमित मुथा, संचालक किशोर गांधी, किशोर मुनोत, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक आदी.

'ड्रायव्हिंग सस्टेनेबल ग्रोथ अँड स्टॅबिलिटी' असा संमेलनाचा विषय होता. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी संमेलनात मार्गदर्शन करताना सहकारी बँकांनी अंमलात आणायची ८ सूत्रे सांगितले. या संमेलनात रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर स्वामीनाथन तसेच विविध खात्यांचे कार्यकारी संचालक, चिफ जनरल मॅनेजर उपस्थित होते. त्यांनीही सहकारी बँकिंगच्या योग्य संचालनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. संमेलनात नागरी सहकारी बँकांसमोरील प्रश्न प्रतिनिधींनी मांडले. त्यास संबंधित अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. सहकारी बँकांबाबत अनेक चांगले निर्णय विचाराधीन असून लवकरच ते जाहीर करण्यात येणार असल्याचे संमेलनात सांगण्यात आले.

यावेळी मर्चंटस् बँकेच्या प्रतिनिधींनी गव्हर्नर शक्तिकांत दास, डेप्युटी गव्हर्नर स्वामीनाथन यांच्याशी संवाद साधला. मर्चंटस् बँकेची सुवर्णमहोत्सवी वाटचाल, बँकेचे संस्थापक केशवराव हल्लीमल मुनोत यांचे सहकारी बँकिंगमधील सलग १५ वर्षांपासूनचे योगदान, बँकेच्या अत्याधुनिक बँकिंग सेवा, संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण केलेली विश्वासार्हता याबाबत गव्हर्नर दास यांच्याशी चर्चा करून माहिती देण्यात आली. त्यांनी सर्व माहिती ऐकून बँकेच्या कामकाजाचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या, अशी माहिती व्हा.चेअरमन अमित मुथा यांनी दिली.

इव्हेंट मॅनेजमेंट सर्टिफिकेट कोर्ससाठी 'आयएमएस'मध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु

नगर – लहान बाळाच्या बारशापासून लग्न समारंभ, कॉर्पोरेट कार्यक्रम, वाढदिवस अशा किलीलरी कार्यक्रमांसाठी सध्या इव्हेंट मॅनेजमेंट हा परवलीचा शब्द बनला आहे. या क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय करण्याच्या तसेच करियर करण्याच्या अनेक चांगल्या संधी उपलब्ध आहेत. त्याद्वीतने नगरमध्ये इव्हेंट मॅनेजमेंटचे परिपूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आयएमएस संस्थेत सर्टिफिकेट कोर्स इन इव्हेंट मॅनेजमेंट घेण्यात येत आहे. या कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून ५ जुलै २०२४ पर्यंत प्रवेश घेता येणार आहे. या कोर्सची ओळख करून देण्यासाठी २५ व २६ जून रोजी मोफत मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक डॉ.एम.बी.मेहता यांनी दिली.

सर्टीफिकेट कोर्स इन इव्हेंट मॅनेजमेंट हा ५ महिन्यांचा कोर्स आहे. दहावी उत्तीर्ण झालेली कोणतीही व्यक्ती, विद्यार्थी, गृहिणीही हा कोर्स करू शकतात. यात थेअरी, प्रॅक्टिकल आणि तज्ज्ञांची व्याख्याने यांचा समावेश आहे. आठवड्यातून तीन दिवस प्रशिक्षण दिले जाणार आहे.

आतापर्यंत संस्थेत हा कोर्स करणाऱ्या अनेकांनी स्वतःचा इव्हेंट मॅनेजमेंटचा व्यवसाय सुरु केला आहे. काही जणांना चांगल्या कंपनीत नोकरीही मिळाली आहे. हा कोर्स केल्यानंतर चांगली नोकरी मिळू शकते, फ्रिलान्सिंग मॅनेजमेंट करता येवू शकते तसेच कन्सलटंट म्हणूनही चांगल्या संधी मिळू शकतात.

सध्या अनेक जण आपल्या कार्यक्रमासाठी चांगल्या इव्हेंट मॅनेजमेंटच्या शोधात असतात. अनेक कॉर्पोरेट कंपन्यांचेही वेगवेगळे इव्हेंट आयोजित करता येवू शकतात. त्यामुळे याचे योग्य शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक असते. अयएमएसने तज्ज्ञांच्या सल्ल्याने अतिशय उपयुक्त कोर्स तयार केला आहे. कोर्समध्ये प्रॅक्टिकल व थेअरीचा समावेश आहे. बेसिक इव्हेंट कन्सेप्ट, इव्हेंट प्लानिंग टूल्स, इव्हेंट मार्केटिंग, इव्हेंट बजेट कसे तयार करावे, वेडिंग प्लानिंग आदी विषयांचे सखोल ज्ञान दिले जाते. कोर्सची अधिक माहिती व प्रवेश प्रक्रियेसाठी संपर्क : ९४२२०८१०९७.

के.जी. कला व वाणिज्य सायंकालीन महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

नगर – केशरचंद गुलाबचंद मुनोत निवासकर सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या अहमदनगर येथील के.जी. कला व वाणिज्य सायंकालीन महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रथम वर्ष कला, वाणिज्य, बीकॉम (स्पेशल सब्जेक्ट- बँकिंग ॲण्ड फायनान्स, कॉस्ट ॲण्ड वर्क अकाउंट, मार्केटिंग मॅनेजमेंट, बिझनेस डमिनिस्ट्रेशन), बी कॉम (कॉम्प्युटर प्लिकेशन), बीकॉम.- बीझनेस मॅनेजमेंट (जुना बीबीए), टेली, पत्रकारिता या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे, अशी माहिती संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत व संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी दिली .

किशोर मुनोत डॉ. स्वाती मुनोत

पुणे विद्यापीठाशी संलग्न व राज्य सरकारची मान्यता असलेल्या व नॅक मूल्यांकन प्राप्त या महाविद्यालयात वरील विविध अभ्यासक्रमाचा समावेश आहे. किल्लयाजवळ, स्टेट बँकेच्या मागील बाजूस संस्थेची सर्व सुविधांनी युक्त अशी तीन मजली इमारत आहे. त्या इमारतीतच हे महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांना सेवाभावी संस्थेमार्फत उत्कृष्ट गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचे हेतूचे हे महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील हे व्यवसायिक अभ्यासक्रमांचे एकमेव सायंकालीन महाविद्यालय आहे. उत्तम गुणवत्ता हे या महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य आहे. याच आधारे एफ. वाय., एस. वाय., टी. वाय. बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांनी संगणक विषयांतर्गत पुणे, सोलापूर इ .ठिकाणी संशोधन व अन्य स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेले आहेत.

या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देऊन त्यांची व्यवसाय कौशल्य वाढवण्यासाठी खास प्रयत्न केला जातो. तसेच इंग्रजी संभाषण वर्ग, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट, संज्ञापन कौशल्य, सेल्फ अवेन्नेस प्रोग्रेम इ. वर भर दिला जातो. तसेच नियमानुसार शासनाच्या सर्व प्रकारचे शिष्यवृत्या मिळवून दिल्या जातात. विद्यार्थिनीकरिता विशेष सुरक्षितता असल्याने विद्यार्थिनींची लक्षणीय संख्या महाविद्यालयात आहे.

के.जी. महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर नेहमी भर देण्याचा कटाक्ष असतो. ज्या अन्वये विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते. के.जी. महाविद्यालयामध्ये पत्रकारिता, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, ऑफिस व्यवस्थापन, इव्हेंट मॅनेजमेंट, डाटा एन्ट्री ॲंड ऑफिस ऑटोमेशन सारखे विविध रोजगारभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जात असून त्याचा विद्यार्थ्यांना उपयोग झालेला दिसून येत आहे.

त्याचप्रमाणे के.जी. महाविद्यालयाचा पुणे येथील लॅक्सीकॉन मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ लीडरशिप ॲंड एक्सलन्स युनिट ऑफ एल. एल. पी.एल यांच्याशी करार झाला आहे.

या करारा अंतर्गत के.जी. महाविद्यालयातील बी.ए., बी. कॉम., बी.बी.ए.(सी.ए.) च्या विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, पुणे, रांजणगाव एम.आय.डी.सी., पिंपरी चिंचवड इंडस्ट्रियल व्हिलेज व रोजगार उपलब्धता समावेश करण्यात आला आहे. के.जी. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास व संज्ञापन कौशल्यासाठी विशेष तयारी करून घेण्यात येते.

तज्ञ प्राध्यापक, अद्ययावत संगणक कक्ष, सुसज्ज वर्ग, शांत परीसर ही महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत. तरी विद्यार्थ्यांनी उपरोक्त अभ्यासक्रमाकरिता त्वरित प्रवेश घ्यावेत. कारण जागा अत्यंत मर्यादित आहेत. अधिक माहितीसाठी ९८ ५० १३ ६६ ५४ व ९०७४३००८३ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच संस्थेच्या kg.college.yahoo.com या वेबसाईटवर भेट देऊ शकता.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण अत्यावश्यक

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – औद्योगिक वसाहतीत होणारी वाढ, वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण यामुळे तापमान वाढ होत असून त्यासाठी वृक्षारोपण हे अत्यावश्यक असून त्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. संस्था करत असलेला हा उपक्रम प्रशंसनीय असून आपण याचा प्रसार समाजामध्ये करून नगर शहरात जास्तीत जास्त झाडे लावायीत आणि त्यांचे पालन पोषण करावे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण अत्यावश्यक आहे तसेच सध्याच्या तणावपूर्ण जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीला अनेक अडचणीला सामोरे जाताना मानसिक ताणतणाव सहन करावा लागतो. यावेळी आपले मन स्थिर असणे आवश्यक असून योगासने हा त्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. पुरातन काळापासून योगधारणा ही आपल्या पूर्वजांना अवगत असून आपणही त्याचा अंगीकार करणे आवश्यक आहे. शहरातील केडगाव लिंक रोडचे काम हाती घेतले असून लवकरच कॉंक्रीटकरणाचे काम पूर्ण होणार आहे, पहिल्यांदाच राज्य शासनाच्या माध्यमातून सुमारे ४ कि मी अंतराचा रस्ता पूर्ण केला जात आहे शहराच्या विस्तारीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे एसा असोसिएशनचे सुरु असलेले सामाजिक काम कौतुकास्पद असून त्याचा आदर्श इतर संस्थांनी घ्यावा एसा असोसिएशनच्या माध्यमातून चांगले इंजिनिअर आर्किटेक्ट निर्माण होतील व एसा भवन ही वास्तू शहराच्या वैभवात भर टाकेल असे प्रतिपादन आ.

लिंक रोड येथील एसा सिटी परिसरात वृक्षारोपण करताना आ. संग्राम जगताप. (छाया – लहू दळवी)

केडगाव लिंक रोड येथील एसा सिटी परिसरात वृक्षारोपण

संग्राम जगताप यांनी केले.

एसा आणि पोलाद स्टील जनता यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित कार्यक्रमात एसा सिटी परिसरात वृक्षारोपण आयोजित करण्यात आले होते. तसेच संस्था सभासदांसाठी जागतिक योग दिनाच्या अनुषंगाने अहमदनगर मधील ख्यातमान योग गुरु सागर पवार यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आणि प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. यावेळी सागर पवार यांनी आपल्या शिष्यांसह उपस्थित सभासद आणि कुटुंबिय यांच्याकडून योगासनांची प्रात्यक्षिके करून घेतली आणि होणाऱ्या फायद्याची अनुभूती उपस्थितांना करून दिली.

यावेळी उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे सचिव प्रदिप तांदळे, इकबाल सय्यद, भूषण पांडव, सुनिल औटी, संकेत पादिर, अनिल मुरकुटे, आबा कडैले, अभिजित देवी, अविनाश देवी, शिरीष कुलकर्णी, सुनिल हळगावकर, दत्तात्रय शेळके, सुनिल जाधव, मधुकर बालटे, राजेंद्र सोनावणे, रविंद्र खडे, छाया खडे, सुजाता सोनावणे आणि सभासद उपस्थित होते.

यावेळी योग गुरु आणि प्रशिक्षक सागर पवार यांनी प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वतःसाठी आणि एसाच्या सभासदांच्या शरीरासाठी दिवसातील एक तास अवश्य द्यावा. योगासनांच्या माध्यमातून विविध दुर्धर आजारातून आपली मुक्ती होऊ शकते त्यासाठी योग मार्गदर्शनाची व्यवस्था असल्याचे नमूद केले. शरीर निरोगी आणि सदृढ ठेवण्याचे काम योगासने करतात. शरीर, मन आणि आत्मा यांचा योग्य समतोल योगासनांच्या माध्यमातून होतो. योगासनांमुळे सकारात्मक विचार आपल्या शरीरात वास करतात असे त्यांनी सांगितले

संस्था अध्यक्ष रमेश कार्ले यांनी बोलताना सांगितले सागर पवार यांनी चीन, मकाऊ अथवा पश्चिमच्या देशात आठ वर्षे योगासनांच्या माध्यमांतून प्रसार केला असून त्यांचे ऑनलाईन प्रशिक्षण अमेरिका, ऑस्ट्रेलिया अश्या विविध देशात चालू आहे असे सांगितले. तसेच सभासदांनी दिवसातील ठराविक वेळ काढून रोज योगासने करून आपले शरीर आणि मन सदृढ ठेवण्याचे आवाहन केले.

संस्थेचे सभासद अनमी. मयूरेश देशमुख यांनी एसा भवन परिसरात विविध प्रकारची देशी झाडे लावण्याचा नकाशा बनवून बुश्रोपण करण्याचा मार्गदर्शन केले.

यश शहा यांनी योग गुरु सागर पवार यांचा परिचय करून दिला, अन्वर शेख यांनी सूत्रसंचालन केले आणि मकरंद देशपांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

छत्रपती अभियांत्रिकीमध्ये योग दिन साजरा

नगर – नेत्री येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यातर्फे आयोजित या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांना योगा विषयक प्रात्यक्षिके आणि त्याचे महत्व समजून सांगण्यासाठी अहमदनगर मधील एस पी जी अध्यात्मध्यान योग गुरुकुल, शाहुनगर, केडगाव येथील ध्यानयोगी गोरचानी सुनील गिरी हे हे योगाचार्य लाभले होते.

नेत्री येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रात्यक्षिक करताना विद्यार्थी.

त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानसाधना पद्धती, हठयोग साधना, शरीर मन शुद्धी साधना अशा बऱ्याच विषयांची माहिती केजेन योग प्रात्यक्षिके सर्वांकडून करून घेतली. उपचारात्मक योगाचे महत्व या योग सत्रामधे योगाचार्य गोरचानी सुनील गिरी यांनी प्रत्यक्षिकांच्या माध्यमातून पटवून दिले.

शारीरिक आरोग्य, मानसिक व भावनिक स्पष्टता यांचे संतुलन राखण्यासाठी योगा अतिशय महत्वाचा असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर खडे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख प्रा. पी. जी. निकम, डॉ. एम. के. भोसले, प्रा. एस. एम. वाळके, प्रा. एल. व्ही. जगताप, प्रा. एस. आर. पवार, प्रा. ए. बी. काळे तसेच शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अविनाश हंडाळ, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे यांच्या समवेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. अक्षय देखणे यांनी करून दिला तर तर आभारप्रदर्शन प्रा. अविनाश हंडाळ यांनी केले.

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक फिरोज इसाक मस्यद, रा. पाचपीर चावडी अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची अनुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांचेकडून वाटणवळ खरेदी देण्याचे ठरविले असुन बिसाराची रक्कम देवीत स्वीकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोजवी व बोजाहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणताही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, दावा, गनाई, दावा, लिन, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांच असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १० दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर पुढतीच कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील या कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जागीच्युर्वक सोडून देले आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - जिल्हा दुय्यती अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर कॅन्टोमेंट हद्दीतील गांधी मैदान येथील ९. दु. निवेधक साहेब, अहमदनगर यांचे वसीतील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

जि. पत. आर. सर्व्हे नं. २१९-१७३ घर नं. २३६ मतील विद्यमान मालक यांचे मालकीच्या जामेमधुन उत्तर बाजुची मिळकत त्याचे क्षेत्र ७८.९६ यौ. मी. (८५७.०० फूट) या मिळकती बाबत.

यांची चतुःसिमा :

पुर्वेस – रस्ता
दक्षिणेस – जि.एल.आर.सर्व्हे नं. २१९-७३ पैकी उर्वरीत क्षेत्र
पश्चिमेस – क्षेत्र
उत्तरेस – रस्ता

वेगेप्रमाणे चतुःसिमापूर्वकच काही एक राखून न ठेविता.

दि. २४/०६/२०२४
अहमदनगर.

अॅड. नाजिम अहमद इस्माईल बेग
अॅड. कुरेशी फैजान फारुक
जुना कलेक्टर ऑफिस कक्ष, झारेकरी, अहमदनगर
मो. ९८८१४१२६० / ७२७६२५२४०८

अहमदनगर मर्चन्ट्स् को-ऑप.बँक लि.

प्रधान कार्यालय – प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४४४ ००१.
फोन नं. : ०२४१-२३२२२२२

–: जाहिर निवेदन :–

(विशेषतः बँकेच्या एम. आय. डी. सी. शाखेतील ग्राहकांसाठी)

बँकेच्या सर्व सभासद, खातेदार, कर्जदार तसेच एम. आय. डी. सी. शाखेतील लॉकरधारक यांना या निवेदनाद्वारे सूचित करण्यात येते की, बँकेची सुरज हाईटस्, नगर-नमनाड रोड, एम. आय. डी. सी., नागापुर, अहमदनगर येथे कार्यरत असणारी शाखा सोमवार दिनांक २४/०६/२०२४ पासुन दर्शना हाईटस्, सर्व्हे नंबर ५/२, नगर-मनमाड रोड, एम.आय.डी.सी., नागापुर, अहमदनगर येथे कार्यरत झालेली आहे. उपरोक्त शाखेचे जुन्या इमारतीमधील कामकाज संपूर्णतः नवीन इमारतीमध्ये कार्यरत झालेले आहे.

संबंधितांनी याची योग्य ती दखल घेऊन त्यांचे व्यवहार दिनांक २४/०६/२०२४ पासुन एम.आय.डी.सी. शाखेच्या नवीन इमारतीमधून करावेत, ही नम्र विनंती.

ठिकाण – अहमदनगर
दिनांक – २४/०६/२०२४

सुनिल पुराणिक – मुख्य कार्यकारी अधिकारी
अमित मुथा – व्हाईस चेअरमन
हसीमल मुनोत – चेअरमन

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकतीचे विद्यमान मालक १) धोंडीबा बापु साठे, २) बाळासाहेब धोंडीबा साठे, ३) राजेंद्र धोंडीबा साठे, सर्व रा. वृंदावन सोसायटी, रेणावीकर झालेमागे, सावेडी, अहमदनगर यांनी सदरील सहा प्लॉटस् मिळकती त्यांचे वैयक्तिक हिस्याप्रमाणे आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देवून ती आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पूर्ण करण्याचे विचारात आहेत. तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब ज्या कोणाचेही कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवसांपासुन १० दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबत्या कागदोपत्री पुराव्यांनीशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटून त्याची खातरजमा करून घ्यावी. व या व्यवहारांस लेखी हरकत घ्यावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राहय धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन :-

मौजे बु-हाणनगर, ता.व जि.अहमदनगर येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील खालील तपशीलाचे बिगरशेती व मंजुर ले आऊटमधील मोकळे प्लॉटस्

स.नं. ६३/१/१क मधील			
प्लॉट नं.	क्षेत्रफळ	पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
२	२६३.२२ चौ.मी.	१२ मी. रस्ता	ओपन स्पेस	लागु स.नं.६४	प्लॉट नं. ३
३	२४२.६६ चौ.मी.	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. २	लागु स.नं.६४	प्लॉट नं.४.
४	२४४.०३ चौ.मी.	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. ३	लागु स.नं.६४	प्लॉट नं. ५.
५	२२८.७२ चौ.मी.	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. ४.	लागु स.नं. ६४	प्लॉट नं. ६.
६	२३०.०१ चौ.मी.	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. ५.	लागु स.नं.६४	प्लॉट नं.७.
७	२३३.४३ चौ.मी.	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. ६.	लागु स.नं.६४	लागु सर्वे नंबर

वेगेप्रमाणे चतुःसिमापुर्वकच्या मिळकती. नोटीस दिली.ता.२४.०६.२०२४.

अॅड. निहाल अहमद बाबुलाल बागवान
श्रेयस लॉन्च्या मागे, सैनिक कॉर्नर, तपोवन रोड, भिस्तबाग, अहमदनगर.
मो. ९९२१३५५७७८

अॅड. विजय प्रल्हाद अग्रे.
'पूर्णश्री' प्लॉट नं. २८, स्वामी गजानन नगर, कजबे मळा, भिस्तबाग, अहमदनगर.
मो. ९८२२०४३९६७.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

अर्थजगत

स्टेट बँकेने आपल्या एसबीआय जनरल इन्शुरन्स आणि एसबीआय पेमेंट अशा कंपन्या विकण्याचा पावले टाकायला सुरुवात केली असल्याचे वृत्त आहे. तथापि आम्ही या उपकंपन्यांचा व्यवसाय वाढण्याची वाट पाहू आणि त्यानंतर या कंपन्यांचे मॉनिटायझेशन करू असे एसबीआयचे अध्यक्ष दिनेश कुमार खारा यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की या उपकंपन्यांचा व्यवसाय विस्तारला की त्यांचे मूल्यांकन वाढेल आणि त्यांच्या विक्रीतून एसबीआयला चांगला परतावा मिळेल. उपकंपन्यांचा विचार केला तर त्यांची कमाई भांडवली बाजारातून होईल, असे त्यांनी पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. ते म्हणाले की या कंपन्यांचा विस्तार वाढला तर आम्ही या कंपन्यांमधील आमची होल्डिंग कमाई वाढण्यासाठी भांडवली बाजारात जाण्याचा विचार करू. परंतु चालू आर्थिक वर्षात हे होण्याची शक्यता नाही असेही त्यांनी नमूद केले.

निवडणूक निकालोत्तर काळात जसे बाजारात तोकाचे चढउतार दिसले तशाच प्रकारची दोलायमानता अर्थसंकल्पाच्या आधी आणि नंतर दरवेळी बाजारात पाहायला मिळते. त्याद्वीपने विचार केल्यास मोदी ३.० सरकारच्या पहिल्या–वहिल्या अर्थसंकल्पाकडे बाजाराचे लक्ष लागून राहिले आहे. गतसप्ताहात निफ्टी ५०, सेन्सेक्स आणि बँक निफ्टी पातली गाठली. बाजारही ही स्थिती 'प्री–बजेट रॅली' म्हणून विषद केली जात आहे. कारण मोदी ३.० सरकारच्या पहिल्यावहिल्या अर्थसंकल्पाकडून शेअर बाजाराला जास्त अपेक्षा आहेत. तथापि, बजेटमधून निराशा झाल्यास तेजीचा हा फुगा किंवा बुडबुडा फुटण्याचीही शक्यता आहे.

बजेटपूर्व तेजीला अर्धविराम मिळणार?

गेल्या काही दिवसात मान्सुन्च्या प्रगतीमध्ये होणारी वाढ मंदावली आहे. पण शेअर बाजारातील तेजी याला अपवाद ठरली आहे. इंट्राडेमध्ये काहीशी घसरण दिसत असली तरी अंतिमतः बाजाराचा मूड तेजीचाच दिसत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी सर्वोच्च पातळीवर आहेत. बीएसईचा निर्देशांक सेन्सेक्सने ७७,८५१ हे नवे सर्वोच्च शिखर सरुया आठवड्यात गाठले; तर निफ्टी५० या निर्देशांकाने २३,६६४ ही नवी सर्वोच्च पातळी गाठून गुंतवणूकदारांना सुखद धक्का दिला. मल्टीबॅगर स्टॉकचा विचार करता त्यात पाच वर्षांत साधारणतः २२७० टक्के परतावा मिळाल्याचे समजते. शेअर बाजारातील तज्ज्ञांच्या मते, मल्टी बॅगर स्टॉकमध्ये भविष्यात आणखी तेजीचे वातावरण आहे. त्यानुसार काही प्रमाणामध्ये आपल्या पोर्टफोलिओमध्ये बदल केल्यास आपल्याही अधिक फायदा मिळू शकेल. बाजारतज्ज्ञांच्या मते, गुंतवणूकदाराने आपला पोर्टफोलिओ हा मार्केटच्या तेजी–मंदीनुसार बदलणे गरजेचे आहे. सध्या बाजारात तुफान तेजी दिसत असली तरी अनेक तज्ज्ञांच्या मते हा तेजीचा बुडबुडा असू शकतो. भारतीय शेअर बाजारात दिसून येत असलेल्या तेजीचे मूळ कारण म्हणजे अमेरिकन बाजारात जोरदार तेजी आहे. त्याचबरोबर एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस, इन्फोसिस, कोटक बँक आणि एसबीआय यांसारख्या दिग्गज कंपन्यांच्या समभागांची तुफान खरेदी होत असल्याने बाजारात भक्कम आधार मिळाला आहे. नेमके त्याच्या विरुद्ध लार्सन अँड टुब्रो, एअरटेल, रिलायन्स, आयटीसी, विप्रो आदी समभागांमधील घसरणीने शेअर बाजारात तेजीला खीळ घातली. शेअर बाजारातील तेजीचा विचार करताना निफ्टी रिअॅलिटीमधील काही शेअर्समध्ये २.८३ टक्क्यांनी घट झाली आहे; तर कंझ्युमर ड्युरेबल क्षेत्रातील काही समभाग १.९६ टक्क्यांनी घसरले आहेत. असे असूनही निफ्टी आणि सेन्सेक्स सार्वकालिक उच्चांकसमीप आहेत.

बाजारची ही स्थिती 'प्री–बजेट रॅली' म्हणून विषद केली जात आहे. कारण मोदी ३.० सरकारच्या पहिल्यावहिल्या अर्थसंकल्पाकडून शेअर बाजाराला जास्त अपेक्षा आहेत. तथापि, बजेटमधून निराशा झाल्यास तेजीचा हा फुगा किंवा बुडबुडा फुटण्याचीही शक्यता आहे.

■ शेअर बाजार

येणाऱ्या काळात मान्सुन्ची प्रगती वेगाने होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. बहुतांश शेतकरी हा शेतीच्या कामाला लागला आहे. त्यामुळे शेतीशी निगडित असणाऱ्या फर्टीलायझर, बी– बियाणे, खते अशा कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी जाणवत आहे. नवीन सरकारने शेतीच्या निवडक अशा ४४ धान्यपिकांची किमान आधारभूत किंमत वाढवली आहे. यामध्ये मक्का, बाजरा, धान, इत्यादी वस्तूंचा त्यामध्ये समावेश करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची क्रयशक्ती त्यामुळे वाढू शकते. या निर्णयामुळे सरकारवर या निर्णयामुळे दोन लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडू शकतो. परंतु या निर्णयामुळे शेतकरी वर्गाच्या खिशात चार पैसे अधिक जमा होऊ शकतील. कारण कृषीबाजारात शेतीमालाच्या किमती घसरल्या तरी एमएसपीद्वारे सरकार अधिक किमतीने त्या पिकांची खरेदी थेट शेतकऱ्यांकडून न केली जाऊ शकते. सबब, या निर्णयामुळे शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढण्यास मदत होणार आहे. अप्रत्यक्षरीत्या या निर्णयाचा फायदा शेअर बाजारातील कृषी व कृषी प्रक्रिया असणाऱ्या उद्योगधंद्यावर होऊ शकेल. तसेच कमोडिटी बाजारामध्ये देखील याचे प्रतिसाद भविष्यामध्ये पहावयास मिळू शकतात. भविष्यात एफआडीओ व्यवहारावर अतिरिक्त करावा बोझा लादला जाऊ शकतो.

मगील आठवड्यामध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाने २० हजार कोटी रुपयांचे एसबीआय लॉंग बॉन्ड मार्केटमध्ये आणण्याचे जाहीर केले. केंद्रीय बोर्डाने यासाठी मंजुरी दिली आहे. त्यामुळे एसबीआयच्या समभागात सरत्या आठवड्यात तेजी दिसून आली. या समभागाने ९१२ रुपये ही उच्चांकी पातळी गाठली. या लॉन्ग टर्म बॉण्डमुळे २० हजार कोटी रुपये २०२५ च्या आर्थिक वर्षामध्ये मार्केटमध्ये प्रवाही होणार आहेत. याचाही परिणाम बाजारातील बँकिंग समभागांच्या तेजीने दिसून आला.

मागच्या आठवड्यात गुरुवारी डॉलरच्या तुलनेमध्ये रुपयाची घसरण झाली. त्याला प्रमुख कारण म्हणजे वोडाफोनची ब्लॉक डिल सुरु शकते. ग्रीन बॅंकेच्या ॲडव्हायजरी मनीष ठाणोवाला यांनी असे सांगितले की साधारणतः ही ब्लॉक डील १५,३०० कोटींची होती. भविष्यामध्ये याचे रुपांतर डाउनलोडमध्ये होईल. त्याचा परिणाम शेअर बाजारात गुरुवारी तेजीमध्ये झाल्यानंतर वाढ होऊन ती स्थिरावली. याच दिवशी डॉलरच्या तुलनेमध्ये रुपया कमजोर झाला. ओलाच्या इलेक्ट्रॉनिक आयपीओला सेबीने मान्यता दिली आहे. येत्या काळात जीएसटी कॉन्सिलने कराच्या दरामध्ये कपात करण्याचा प्रस्ताव दिला आहे. भविष्यामध्ये कराचे दर कमी झाल्यास याचा सकारात्मक परिणाम उद्योगक्षेत्रावर दिसू शकतो. हे गुंतवणूकदार, ट्रेडर वर्गाने लक्षात घ्यावे.

सध्याच्या काळामध्ये कोणत्याही समभागांची खरेदी करीत असताना शेअर्सचे व्हॅल्युएशन लक्षात घेवणे गरजेचे आहे. महागडे शेअर्स न खरेदी करता मूल्यांकनाच्या अभ्यास करणे गुंतवणूकदारांना आवश्यक ठरते. यासाठी गुंतवणूकदारांने तांत्रिक विश्लेषणाचेसा पायामूलत विश्लेषणाकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच निवडक समभागांचे मूल्य वाढूर किंमत कमी झाली असेल असेच शेअर्स खरेदी करणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळामध्ये कमोडिटीमध्ये तेजी येण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा हेजर्स, पोझिशन घेणारा ट्रेडर्स घेऊ शकतो. कमोडिटी किंवा वायदा बाजारामध्ये गुंतवणूक करीत असताना गुंतवणूकदारांने भविष्यामध्ये तेजी राहील का मंदी राहील, याचा सखोल व वास्तविक अभ्यास करुनच पोझिशन तेवणे किंवा काढून टाकणे गरजेचे आहे.

जून महिन्यात निकालानंतर झालेल्या उलथापाथलथीनंतर भारतीय शेअर बाजार उच्चांकाकडे जाऊन स्थिरावताना दिसत आहे. पण अर्थसंकल्पाच्या पूर्व व पश्चात काळात पुन्हा अशी उलथापालथ होऊ शकते. भांडवली बाजारामध्ये अपेक्षा बजेटमधून पूर्ण होतात का, शेअर बाजारावर लादले गेलेले कर कमी होतील का प्राप्तीकराची मर्यादा व कराचे दर कसे राहतील ? अर्थसंकल्पातून कोणत्या सेक्टरला झुकते माप मिळेल? यावर बाजारची पुढील वाटचाल अवलंबून असणार आहे. वाढीव करांचा बोजा लादल्यास शेअर बाजारच्या वाटचालीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकते.

– प्रदीप गुडसूरकर,
शेअर बाजार विश्लेषक

◆◆◆

■ सेन्सेक्स : ७६,९९२.७७ (+१८१.८८)
■ निफ्टी : २३,४६५.६० (+६६.७०)
■ बँक निफ्टी : ५०,००२.०० (+१५५.३०)
■ फिन निफ्टी : २२,४१९.९५ (+१९५.२५)

गतसप्ताहातील शेवटच्या सत्राचे बंदपातळी भाव

कमी जोखमीची गुंतवणूक

म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करताना जादा आणि चांगला परतावा मिळेल हा विचार केला जाणे आणि त्यानुसार फंडाची निवड केली जाते. पण शेअर बाजारातील घसरण ही म्युच्युअल फंडामधील परतावाला नकारात्मकता देतात. यामापलू मुक्तता मिळवण्यासाठी आणि परतावाचा संतुलन राहावे म्हणून म्युच्युअल फंड कंपन्यांनी लोकांची गरज ओळखून इक्विटी फंडाचा सादर केले. अर्थात इन्कम फंड बाजारात अगेदरपासूनच सक्रिय आहे, मात्र कोरोना काळानंतर म्युच्युअल फंड कंपन्यांनी नव्या प्रकारच्या इन्कम फंड बाजारात आणला. त्याचे फायदे जाणून घेऊ.

■ म्युच्युअल फंड

इन्कम फंडला डेब्ट फंडच्या श्रेणीत टेवले आहे. हा फंड दीर्घ कालावधीसाठी डिबेंचर, कॉर्पोरेट बॉंड आणि सरकारी रोखे यांच्यात गुंतवणूक करतो. बाजार नियामक सेबीने इन्कम फंडला डेब्ट फंड म्हणून उल्लेख केला आहे. यानुसार त्याचा कालावधी चार वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक असेल. इन्कम फंडची दोन श्रेणीत विभागणी करु शकतो. यात पहिली श्रेणी मध्यम आणि दीर्घ कालावधीच्या फंडाची असून त्याचा कार्यकाळ चार ते सात वर्षांचा राहू शकतो. त्याचवेळी दुसरी श्रेणी दीर्घकालसाठी असून त्याचा कार्यकाळ सात ते दहा वर्षांचा असतो.

इन्कम फंड कसे काम करते म्युच्युअल फंड कंपन्या इन्कम फंड श्रेणीनुसार आपल्या ग्राहकांना चांगला परतावा देण्याचा प्रयत्न करत असतात. व्याज दर वाढणे किंवा कमी होणे याचा कोणताही परिणाम फंडवर होऊ दिला जात नाही. तसेच फंड मॅनेजर गुंतवणूकदारांना चांगला परतावा देण्यासाठी प्रयत्नशील असतात. फंड मॅनेजर हा गुंतवणूकदारांना चांगले व्याजही मिळवून देतो आणि त्यावेळी बाजारच्या चढ उतारावा देखील नफावा मिळवून देतो. इन्कम फंड हे उच्च सुरक्षा आणि कमी व्याजदर असलेल्या आर्थिक साधनात गुंतवणूक करण्यास प्राधान्य देते.

कोणासाठी चांगला फंड?

मध्यम कालावधीसाठी गुंतवणुक करणाऱांना हा फंड चांगला पर्याय सिद्ध होऊ शकतो. अर्थात कमी जोखीम असणाऱा गुंतवणूक साधनांचा शोध घेणाऱा मंडळींना इन्कम फंड हा एक पर्याय आहे. इन्कम फंडासाठी देखभालीपोटी आकारण्यात येणाऱा कमाल खर्चाच्या प्रमाणाची मर्यादा २.२५ टक्के निश्चित केली. अर्थात फंड मॅनेजरकडून शुल्क आणि कमिशनच्या रुपातून कमाल २.२५ टक्क्यांपर्यंत रक्कम कपाली जाणू शकते. हा फंड डेटप्रमाणे काम करत असल्याने त्याचा परतावा फारसा मिळत नाही. अशावेळी फंड मॅनेजर हा शुल्कसह आदी निश्चित केलेल्या दरानुसार कमाल खर्च वसुली करत असेल तर परतावाव्यवहार त्याचा परिणाम होतो. अर्थात जोखीम कमीच राहाते आणि गुंतवणूकदारांवर नुकसान सहन करण्याची वेळ येत नाही.

कमाल जोखीम किती?

डेब्ट फंड असल्याने इन्कम फंडमध्ये हा डेब्ट सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करत त्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत करण्याच्या दृष्टीने रचना केलेली असते. जेव्हा व्याजदर उतरते तेव्हा या फंडामध्ये गुंतवणूक करणे फायद्याचे राहू शकते. मात्र व्याजदर वाढते तेव्हा बाहेर पडणे उपयुक्त राहू शकते. वास्तविक कॉर्प मॅनेजर आपल्या गुंतवणुकीची काळजी घेते आणि वेळोवेळी आपले मत जाणून घेण्याचाही प्रयत्न करत असतो.

कर आकारणी कशी?

इन्कम फंडावर भांडवली लाभ कर आकरला जातो. हा कर होल्डिंगच्या कालावधीनुसार लागू केला जातो. आपण दीर्घकाळ गुंतवणूक करत असाल तर त्यानुसार कर आकारला जातो. गुंतवणूक तीन वर्षांची असेल तर आपल्याला मिळणाऱा लाभावर एसटीसीजी आकारला जातो आणि ते उत्पन्न प्राप्तिकाराच्या स्लॅबनुसार गृहित धरले जाते. गुंतवणूक तीन वर्षांपेक्षा अधिक काळातील असेल तर त्याला एलटीसीजी लागू होईल. दीर्घकाळ भांडवली नफ्यावर इंडेक्सेशनचा लाभ देत २० टक्के कर आकारला जातो.

◆◆◆

सोने ठेवा, पैसे कमवा!

आपण घरात ठेवलेल्या सोन्यावरही पैसा कमावू शकता. यासाठी एसबीआयने योजना आणली आहे.यानुसार आपण घरात ठेवलेले सोने बँकेत जमा करुन पैसा कमवू शकतो आणि सोने देखील अधिक सुरक्षित ठेऊ शकतो. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या रिवॅम्प गोल्ड डिपॉझिट स्किमनुसार आपण बँकेत सोन्याच्या आधारावर कर्ज देखील सहजपणे मिळू शकते.

किती मिळेल व्याज ? :

एसटीबीडी श्रेणीनुसार सोन्याची एक वर्षासाठी मुदत ठेवी केल्यास ०.५० टक्के व्याज दिले जाते. तर दोन वर्ष आणि तीन वर्षाच्या मुदत ठेवीसाठी अनुक्रमे ०.५५ आणि ०.६० टक्के व्याज दिले जाते. याशिवाय एमटीजीडी श्रेणीनुसार २.२५ टक्के दराने दरवर्षी व्याज दिले जाते. त्यावेळी एलटीजीडी श्रेणीनुसार सोन्याची मुदत ठेव केल्याने २.५ टक्के वार्षिक दराने व्याज दिले जाते.

किती सोने ठेवू शकता? : रिवॅम्प गोल्ड डिपॉझिट स्किमनुसार ग्राहकांना कमीत कमी ३० ग्रॅम सोने ठेवता येऊ शकते. अर्थात कमाल मर्यादा कोणतिही नाही. आपण किताही सोने बँकेत ठेवूत व्याज मिळवू शकता.

मॅच्यूरिटीचा कालावधी किती असेल?: या योजनेनुसार एसबीआयने तीन श्रेणी आणल्या आहेत. पहिल्या श्रेणीत १ ते ३ वर्षासाठी सोने जमा केले जाते. **यात शॉर्ट टर्म बँक डिपॉझिट (एसटीबीडी) असे म्हटले जाते. दुसऱा श्रेणीत मीडियम टर्म गव्हर्नमेंट डिपॉझिट (एमटीजीडी) असे म्हटले जाते. त्याचा मॅच्यूरिटीचा कालावधी हा ५–७ वर्षाचा आहे. त्याचवेळी लॉंग टर्म गव्हर्नमेंट डिपॉझिट (एलटीजीडी) श्रेणीनुसार १२ ते १५ वर्षासाठी सोने फिक्स्ड करता येते.**

■ जाणून घ्या

व्याज कसे मिळेल? : मुदत ठेवीची मॅच्यूरिटी पीरियड संपल्यानंतर ग्राहकांकडे व्याजासकट सोने घेण्याचे दोन पर्याय मिळतात. एक तर सोने परत घेणे किंवा सोन्याच्या तत्कालिन किमतीच्या बरोबरीने कॅश घेणे. अर्थात सोन्याच्या रुपाने एफडी परत घेतल्यानंतर ०.२० टक्के दराने ॲडमिनिस्ट्रेशन चार्ज वसूल केला जातो.

मुदतपूर्व काढल्यास काय होईल?: एसटीबीडी श्रेणीनुसार एक वर्षाचा लॉक इन पीरियड असतो. त्याचा कालावधी पूर्ण होण्याअगोदर पैसा काढल्यास व्याजदरावर पेनल्टी आकारली जाते. त्याचवेळी एमटीजीडी श्रेणीनुसार गुंतवणूदार तीन वर्षानंतरही कधीही योजनेबाहेर पडू शकतो. अर्थात मॅच्यूरिटी पीरियडच्या अगोदर स्किम ब्रेक केल्यास व्याजदरावर पेनल्टी आकारली जाते.

याशिवाय एलटीजीडी श्रेणीनुसार ५ वर्षानंतर सोने काढता येते. यातही व्याजदरावर पेनल्टी आकारली जाते.

एफडी कोण करू शकते? : भारतीय इंडिव्हिज्युअल्स, प्रोप्रायटरशिप आणि पार्टनरशिप फर्म, हिंदु अविभाजित कुटुंब (एचयूएफ), सेबीबरोबरच नोंदणीकृत म्युच्युअल फंड/ एक्स्चेंज ट्रेडेड फंड यासारख्या ट्रस्ट आणि कंपन्या देखील या योजनेनुसार गुंतवणूक करु शकतात.

◆◆◆

क्रेडिट कार्डद्वारे पेमेंटचे नियम बदलणार



येत्या १ जुलै २०२४ पासून क्रेडिट कार्ड पेमेंटशी संबंधित बदल लागू होणार आहेत. यानंतर, काही पेमेंट प्लॅटफॉर्मद्वारे बिल भरण्यात समस्या येऊ शकते. या प्लॅटफॉर्मध्ये क्रेड, फोनपे, बिलडेस्कसारख्या काही फिनटेकचा समावेश आहे. यामुळे वापरकर्त्यांवर काय परिणाम होऊ शकतो ?

आरबीआयच्या नवीन नियमानुसार, १ जुलैपासून सर्व क्रेडिट कार्ड बिल पेमेंट भारत बिल पेमेंट सिस्टम म्हणजेच बीबीपीएसद्वारे केले जाणार आहे. त्यानंतर प्रत्येकाला याद्वारेच बिलिंग करावे लागणार आहे. त्यानुसार ८ बँकांनी त्यांचे पाऊल पुढे टाकले आहे. यामध्ये एसबीआय, बँक ऑफ बडोदा, कोटक महिंद्रा बँक, फेडरल बँक आणि इंडसइंड बँक यांचा समावेश आहे. अनेक मोठ्या बँकांनी नवीन बदलांतर्गत त्यांचे नियम बदलले नाहीत आणि यामध्ये एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक आणि ॲक्सिस बँक यांचा समावेश आहे. हे नवीन नियमन भारतीय रिझर्व्ह बँकेने पेमेंट प्रक्रिया सुलभ करण्याच्या आणि भारताची पेमेंट प्रणाली अधिक सुरक्षित करण्याच्या उद्देशाने आणले आहे.

बीबीपीएसने नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या सहकार्याने वेगवेगळ्या पेमेंट सेवांसाठी एकच प्लॅटफॉर्म तयार करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

बीबीपीएस ही ग्राहकांना ऑनलाइन बिल भरण्याची सेवा प्रदान करते. तीं एनपीसीआयच्या अंतर्गत काम करते. समजा या नियमाचे पालन करण्यात आले नाही तर याचा परिणाम क्रेडिट कार्ड पेमेंटवर अवलंबून असलेल्या फिनटेक प्लॅटफॉर्मसाठी होऊ शकतो.

हप्ता परत देणारा टर्म इन्शुरन्स प्लॅन

लाइफ इन्शुरन्स किंवा जीवनविम्याचा मुद्दा येतो तेव्हा आपल्या डोक्यात पहिल्यांदा टर्म इन्शुरन्स प्लॅन येतो. यामागचे कारण म्हणजे हा प्लॅन क्वापीची स्वस्त असतो आणि त्यातील जोखमीचे कवचही अधिक असते. आपल्या कुटुंबाला भविष्यातील आर्थिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीनी टर्म इन्शुरन्स घेणे आवश्यक आहे. त्यावेळी एखादा व्यक्ती टर्म इन्शुरन्स घेतो तेव्हा त्याचा कधी प्रमाणात का होईना कॅशबॅक मिळेल, असा विचार करतो. कारण हा प्लॅन बराच काळ चालतो आणि त्यात विमाधारकाला कोणताही फायदा मिळत नाही. दीर्घकाळ हप्ते भरता भरता तो कंटाळून जातो. लोकांची हीच मानसिकता पाहून विमा कंपनीने एक नव्या प्रकारचा टर्म इन्शुरन्स प्लॅन 'टर्म प्लॅन विथ रिटर्न ऑफ प्रीमियम' बाजारात आणला.

टर्म प्लॅनच्या बदल्यात काहीतरी फायदा मिळावा असा उद्देश ठेवणाऱा लोकांसाठी कंपनीने टर्म प्लॅन विथ रिटर्न ऑफ प्रीमियम सादर केला. टर्म इन्शुरन्सच्या या प्लॅनमध्ये कंपन्या विमाधारक ग्राहकाला हप्त्याची रक्कम परत देण्याचा पर्याय देते. परिणामी विमाधारकाला हा प्लॅन फायदेशीर वाटू शकतो. हप्ता परत देणारा हा टर्म प्लॅन सामान्य टर्म इन्शुरन्स प्लॅनप्रमाणेच आहे. मात्र या योजनेतील नियमित प्लॅनपेक्षा असणारे वेगळेपण म्हणजे 'सरवाईवल बेनिफिट'. पॉलिसीधारक या प्लॅनच्या माध्यमातून सरवाईवल बेनिफिट मिळवू शकता आणि विमाधारकाने भरलेला हप्ता परत मिळवू शकता. हप्ता परत देण्याच्या योजनेत जीएसटीसह वसुल केलेली रक्कम परत मिळत नाही. या प्लॅनशी संबंधित ॲड ऑन बेनिफिटमध्ये अपंगत्व, आकस्मिक मृत्यूचे वारसादारास मदत आणि क्रिटीकल इलनेसपासून सुरक्षा याचा समावेश आहे.

मॅच्योरिटीवर हप्ता परत मिळतो?

रिटर्न ऑफ प्रीमियमचा टर्म प्लॅन हा एक स्टँडर्ड टर्म प्लॅनप्रमाणेच आहे. ही योजना जीवन विमा पॉलिसीप्रमाणे काम करते आणि पॉलिसीच्या लाभार्थ्यांना डेथ बेनिफिट प्रदान करते. यातील विशेष गुण म्हणजे मॅच्योरिटी बेनिफिट. पॉलिसीधारक अतिरिक्त हप्ता भरून टर्म प्लॅन विथ रिटर्न ऑफ प्रीमियमचा फायदा घेऊ शकतात. या प्लॅनसाठी आपण सम ॲश्योर्ड अर्थात विमा रक्कमेची स्वतः निवड करू शकता आणि पॉलिसीचा कालावधी देखील निवडू शकता. आपण निवडलेला कालावधी आणि जोखमीचे कवच यानुसार हप्ता निश्चित होतो. पॉलिसी मॅच्योर होते, तेव्हा विमा कंपनी विमाधारकाने भरलेला हप्ता परत करते.

कोणासाठी प्लॅन उपयुक्त

आर्थिक जबाबदारीचे स्वरुप प्रत्येकाचे वेगळे राहू शकते. जीवनशैली आणि उत्पन्नाचे मार्ग देखील वेगवेगळे राहू शकतात. कोणताही व्यक्ती वर्तमानाकाळाबरोबर समाधानी असतो. त्याचे खर्च आरामात सुरू असतात आणि कोणतीही अडचण नसते. परंतु भविष्यासाठी त्याच्याकडे काहीच नसते. अर्थात तो नसण्याच्या स्थितीत कुटुंबीयांचे आर्थिक भवितव्य कसे राहील, याबाबत तो चिंताग्रस्त असतो. अशा लोकांसाठी प्रीमियम परत देणारा टर्म प्लॅन इन्शुरन्स योजना महत्त्वाची ठरते. अर्थात आतापर्यंत बहुतांश लोकांनी नेहमीचाच टर्म प्लॅन घेतलेला आहे. परंतु हा नवीन पर्याय आल्याने अनेकांनी त्यास पसंती दिली आहे.

■ इन्शुरन्स झोन

इन्शुरन्स प्लॅन हा अविवाहित लोकांना उपयुक्त आहे. निवृत्तीजवळ पोचलेले परंतु विवाहित नसलेल्या लोकांसाठी हा प्लॅन चांगला राहू शकतो. यामागचे कारण म्हणजे असू शकतात. यात महत्त्वाचे कारण म्हणजे वयस्कर आई वडिलांच्या जबाबदारीमुळे त्या व्यक्तीने विवाह केलेला नसतो. अशा लोकांना हप्ता परत देणारा प्लॅन चांगला राहू शकतो. एखादा व्यक्ती वयस्कर पालकांची काळजी घेतो आणि कालांतराने तो खर्च उचलण्यास सक्षम राहत नाही तेव्हा त्याला हप्ता परत देणारा टर्म प्लॅन चांगला ठरु शकतो. याशिवाय एखादा व्यक्ती विवाहित असेल आणि त्यास अपत्य नसतील आणि तो पत्नीच्या उत्पन्नावर अवलंबून असेल तर त्याच्यासाठीही रिटर्न ऑफ प्रीमियम प्लॅन चांगला आहे. या प्लॅनमध्ये लाइफ कव्हरचा समावेश असतोच, त्याचवेळी पॉलिसीच्या मॅच्योरिटीवर मिळणारा लाभ हा भविष्यातील आर्थिक चिंता दूर करतो.

या प्लॅनवर मिळणारा फायदा

रिटर्न ऑफ प्रीमियम टर्म प्लॅन घेणारा व्यक्ती कर लाभापासून वंचित राहत नाही. सामान्य टर्म इन्शुरन्स घेणाऱा व्यक्तीला मिळणारी कर सवलत या प्लॅनला देखील लागू आहे. टर्म प्लॅनसाठी भरलेला हप्ता आणि जोखीम कवचची रक्कम ही पूर्णपणे करमुक्त आहे. रिटर्न ऑफ प्रीमियम विमा योजनेनुसार दीड लाखापर्यंतच्या हप्त्याच्या रक्कमेवर करसवलत मिळवू शकता.

हप्त्याची रक्कम जादा

या योजनेत हप्ता परत मिळत असल्याने विमा कंपन्यांकडून हप्त्याची रक्कम ही जादा ठेवली जाते. अर्थात यात कर सवलत मिळण्यापोक्षा हप्ता संतुलीत ठेवू शकतो. या प्लॅनमध्ये विमाधारकांना आपल्या गरजेनुसार सम ॲश्योर्ड, कालावधी आणि हप्ता भरण्याचे स्वातंत्र्य ठेवले आहे. त्याचबरोबर पॉलिसी मॅच्युअर झाल्यानतर एकरकमी पैसे परत मिळतात. या प्लॅनसाठा आपल्याला ६० वर्षापर्यंत हप्ता भरावा लागतो आणि त्यानंतर त्यास वयाच्या ८५ वर्षापर्यंत मुदतवाढ देऊ शकतो.

◆◆◆

शेतकरी, युवक व घरकुल वंचितांच्या प्रश्नावर खा. राहुल गांधी यांच्याकडे आग्रह धरणार

महाराष्ट्रात सरकार आणण्यासाठी धोरण जाहीर करण्याची मागणी, लोकभझाक चळवळीचा पुढाकार

नगर – महाराष्ट्रातील येत्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकभझाक चळवळीचे कार्यकर्ते काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांच्याकडे शेतकरी, बेरोजगार युवक व घरकुल वंचितांचे प्रश्न सोडविण्यासह विविध प्रकल्प राबविण्याची मागणी करणार आहे. महाराष्ट्रातील कोरडा जिरायतदार अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी धनराई जलकर्णिका, ठिबक सिंचन हंगामी बागायती करण्यासाठी आणि त्याचबरोबर महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना दारिद्र्याच्या खाईतून आणि आत्महत्येच्या छायेतून बाहेर काढण्यासाठी कृषीभझाक कार्यक्रम राबविण्यासंदर्भात चर्चा करणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

आधुनिक तंत्रज्ञानाने फार मोठी प्रगती केली आहे. प्रत्येक पाच एकर जिरायती जमिनीमध्ये २० फूट लांब १५ फूट रुंद आणि १५ फूट खोल खड्डा खोदून त्यामध्ये दगड गोटे टाकून शेतामध्ये उतारापद्धा बाजूलाही जलकर्णिका करण्याचा प्रस्ताव आहे. जलसंधारण तंत्राशील शंभर टक्के यशस्वी होणारी जलकर्णिका योजना आहे. त्यामुळे त्या शेतातील दरवर्षी किमान २० ते ३० लाख लिटर पावसाचे पाणी जमिनीमध्ये मुरवले जाऊ शकणार आहे. त्यातून त्या जमिनीसह शेजारच्या जमिनीचा भूगर्भाची जळपातळी वाढणार आहे. तर ठिबक सिंचनने हंगामी बागायतदार शेतकरी उभे राहू शकणार आहेत. त्याचबरोबर जलकर्णिकांच्या शेजारी आंबा, चिंच, सिताफळ, आवळा, बोर इत्यादी फलझाडांची धनराई या जमिनीत जलकर्णिकेच्या भोवती उभी करता येणार आहे. भर उन्हाळ्यात देखील या फळझाडांना सिंचन पाणी मिळाले नाही, तरी त्यावर विपरीत परिणाम होणार नाही. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक हंगामी बागायतदार बनविता येणार असून, काँग्रेस पक्षाने याबाबत क्रांतिकारक भूमिका घेऊन २ कोटी शेतकरी, शेतमजुरांना दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी आश्वासन दिल्यास काँग्रेस आणि मित्र पक्षाचे सरकार महाराष्ट्रात आणणे सोपे होणार असल्याची भूमिका संघटनेच्या वतीने मांडण्यात आली आहे.

प्रत्येक शहराच्या सीमेबाहेर लॅण्ड व्हॅल्यू कॅप्चर योजनेद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात ५० लाख घरकुल वंचितांना भूमि गुंठा देण्याची भूमिका काँग्रेस पक्षाने घेतली पाहिजे. सरकारी लिजेसीवर बोजा न पडता जमीन मालक शेतकऱ्यांना देखील बाजारभावाचे दुप्पट किंमत मिळेल आणि घरकुल वंचितांना अल्प किमतीत म्हणजे फक्त ५० हजार रुपयात भूमीगुंठा मिळू शकणार आहे. त्याचबरोबर राज्यातील ५० लाख बेरोजगार लोकांना स्वयंरोजगारची हमी या योजनेअंतर्गत मिळणार आहे. काँग्रेस पक्षाचे सरकार राज्यात आणून एक गुंठा अल्प किमतीत देण्याची तयारी दाखवून महाराष्ट्रातील शेतकरी, बेरोजगार युवकांचा व घरकुल वंचितांचा प्रश्न सोडविण्याची आग्रही मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

भाजपने धर्म, देव, उंबऱ्याच्या बाहेर आणले आणि त्याचा बाजार मांडला. त्याचबरोबर लोकांची दिशाभुल करुन गेल्या लोकसभा निवडणुकीत चारशे पारची घोषणा केली. परंतु भारतातील मतदारांनी मध्यमवर्ग वापरून पंतप्रधान मोदी यांच्या झोळीत बहुमत टाकले नाही. महाराष्ट्रात भाजपचे आणि त्यांच्या मित्र पक्षाचे सरकार येण्याचे अजिबात शक्यता नाही. या परिस्थिती ओळखून काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षाच्या महाविकास आघाडीने घरकुल वंचित, बेरोजगार व शेतकरी यांच्या कल्याणासाठी भूमिका जाहीर केल्यास महाराष्ट्रात काँग्रेसचे मुख्यमंत्री असलेले सरकार नक्कीच येऊ शकणार असल्याचे ॲड. गवळी यांनी म्हंटले आहे. या मागणीसाठी ॲड. गवळी, संजय बारस्कर, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे, अशोक भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

मनपा प्रशासनाने फायर ऑडिट करण्यात यावे, या मागणीचे निवेदन मनसेच्यावतीने मनपा उपायुक्त यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष किरण प्रशांत शेरकडे यांनी दिले. याप्रसंगी अमोल गोरे, सनी भुजबळ, ऑकार जगदाळे, विशाल भटेजा, मोहित कुलकर्णी, समर्थ मुर्तडक, ऋषी सोनवणे, उदित सूर्यवंशी आदि उपस्थित होते.

नगर शहरातील व्यासायिक इमारतींचे फायर ऑडिट करावे अन्यथा आंदोलन करण्याचा 'मनसे'चा इशारा

नगर – शहरातील व्यावसायिक इमारतीचे मनपा प्रशासनाने फायर ऑडिट करावे, या मागणीचे निवेदन मनसेच्यावतीने मनपा उपायुक्त यांना शहर उपाध्यक्ष किरण रोकडे यांनी दिले. याप्रसंगी वाहतूक सेनेचे विभाग संघटक अमोल गोरे, विभाग अध्यक्ष सनी भुजबळ, उपविभाग अध्यक्ष ओंकार जगदाळे, विशाल भटेजा, मोहित कुलकर्णी, समर्थ मुर्तडक, ऋषी सोनवणे, उदित सूर्यवंशी आदि उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नुकतेच पत्रकार चौकातील एक व्यावसायिक दुकानाला आग लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने त्यात कुठल्याही प्रकारची जिवित हानी झाली नाही. परंतु नगर शहरात आतापर्यंत बऱ्याच आग लागण्याच्या घटना घडत आहेत.

या घटना टाळण्यासाठी शहरातील सर्व इमारतींचे फायर ऑडिट होणे आवश्यक आहे. मनपाप्रशासनाकडुन्व्यावसायिक इमारतींचे फायर ऑडिट होत नाही, त्यामुळे अशा घटना घडत आहेत. भविष्यात अशा प्रकारची आग लागून जिवीत हानी होऊ शकते, मनपाने या संदर्भात जर कुठलेही ठोस पाऊल उचलून प्रतिबंधात्मक उपाय केले नाहीत तर मनसेचे शहर अध्यक्ष गजेंद्र राशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेत मोठ्या स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.

नगरमध्ये दोन ठिकाणाहून कांदा बियाणांची झाली चोरी

नगर – वाहनातून दोन पेट्या (६० पाकीट) कांदा बियाणे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याच्या दोन घटना नगर शहरात मार्केट यार्ड परिसरात घडल्या आहेत. एकूण ५८ हजार ५०० रुपये किमतीचे हे कांदा बियाणे होते. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अरबाज निसार शेख (वय २६ रा. गाझीनगर, काटवन खंडोबा, नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी (दि.२१) दुपारी शेख यांनी त्यांच्या ताब्यातील टेम्पो माळीवाडा भागातील वसंत टॉकीज रस्त्यावर अरिहंत ड्रायफ्रूट दुकानासमोर उभा केला होता. ४:४० ते ४:५० दरम्यान अज्ञात चोरट्याने टेम्पोतून २८ हजार ५०० रुपये किमतीची येलोरो कंपनीची कांदा बियाणे पेटी चोरून नेली. त्यामध्ये ३० पाकीट बियाणे होते. याप्रकरणी शेख यांनी शनिवारी (दि.२२) दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश सुखदेव दळवी (वय ३५ रा. म्हसणे ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दळवी यांनी शनिवारी सायंकाळी मार्केटयार्ड येथे त्यांच्या ताब्यातील वाहन (एमएच १६ सीसी ४७२८) पार्क करून बाबीस्कर टेक्नोलॉजी, मार्केटयार्ड येथील कृषी सेवा केंद्रात ऑर्डरप्रमाणे कृषी माल ताब्यात घेण्यासाठी गेले असता सायंकाळी सहा ते साडेसहाच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने वाहनातून ३० हजार रुपये किमतीची येलोरो कंपनीची कांदा बियाणे पेटी चोरून नेली. त्यामध्ये ३० पाकीट बियाणे होते. याप्रकरणी दळवी यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. पोलिसांनी दोन्ही गुन्हे दाखल करत चोरट्यांचा तपास सुरु केला आहे.

श्रमिक कष्टकऱ्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

'यशवंती मराठा महिला मंडळाचा मार्कंडे'य शाळेत उपक्रम

नगर – शहरातील यशवंती मराठा महिला मंडळाच्या वतीने श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय विद्यालयातील इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षण घेणाऱ्या कष्टकरी कामगार वर्गातील मुलांना शिक्षणासाठी या उपक्रमाद्वारे प्रोत्साहन देण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी माजी नगरसेविका दिपालीताई बारस्कर, संस्थापिका अध्यक्षा मायाताई कोल्हे, जिल्हाध्यक्षा गीतांजली काळे, उपाध्यक्षा कविता दरंदले, शहराध्यक्षा मिराताई बारस्कर, माजी शहराध्यक्षा आशाताई शिंदे, मेघाताई झावरे, राधिका शेलार, मंगलाताई काळे, राजश्री पोहेकर, लता भापकर, आशाताई कांबळे, अपर्णा शेलार, मीनाक्षी जाधव, मार्कंडेय शाळेच्या मुख्याध्यापिका विद्याताई दगडे, माध्यमिकचे मुख्याध्यापक शशिकांत गोरे, लीनाताई नेटके, डॉ. संध्या इंगोले आदींसह महिला सदस्या, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यशवंती मराठा महिला मंडळाच्यावतीने श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय विद्यालयातील १० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना दिपालीताई बारस्कर, मायाताई कोल्हे आदी पदाधिकारी, मुख्याध्यापिका विद्याताई दगडे आदी.

दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, यशवंती मराठा महिला मंडळ समाजातील सर्वसामान्य महिला प्रोत्साहन देण्याकरिता यशवंती मराठा महिला मंडळाच्या सदस्यांनी हा उपक्रम राबविण्यात आला. सर्वसामान्य घटकांतील विद्यार्थ्यांना आधार दिल्यास त्यांची परिस्थिती सुधारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या विद्यार्थी वर्गाच्या विकासात्मक दृष्टीकोनाने घेत असलेले उपक्रम कौतुकास्पद आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या एकत्रित मेहनतीने विद्यार्थ्यांनी बोर्डच्या परीक्षेत यश मिळवले आहे. मुलांपेक्षा मुली शिक्षणात आघाडीवर असल्याचे अभिमान वाटत आहे. परिस्थिती माणसाला घडवते मार्कंडेय विद्यालयातील कष्टकरी श्रमिकांची मुले–मुली शिक्षणाने आपले भवितव्य घडवत असल्याचे त्यांनी सांगितले.

मिराताई बारस्कर यांनी शिक्षणाने सर्वसामान्य घटकातील मुलांच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टीकोनाने व शिक्षणासाठी यशवंती मराठा महिला मंडळाच्या सदस्यांनी हा उपक्रम राबविण्यात आला. सर्वसामान्य घटकांतील विद्यार्थ्यांना आधार दिल्यास त्यांची परिस्थिती सुधारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्रुती संगीत निकेतन आणि संगीत विकास सभा आयोजित 'स्वरयज्ञ' कार्यक्रमात गायनाची मैफल सादर करताना डॉ.पं.विकास कशाळकर. दुसऱ्या छायाचित्रात मुंजारव मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

'स्वरयज्ञ २०२४' मध्ये २४ कलाकारांनी सादर केली कला

नगर – श्रुती संगीत निकेतन अ'नगर आणि संगीत विकास सभा पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने स्वरयज्ञ २०२४ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम पेमराज सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात झाला. ज्येष्ठ गायक आणि गुरु पं.राजानन्दबुवा जोशी यांच्या पुण्यस्मरणार्थ ही शास्त्रीय संगीताची मैफल दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी साजरी होत असते. ज्येष्ठ गायक आणि गुरुवर्य पं.विकास कशाळकर आणि त्यांचे देश विदेशातील शिष्यगण शिष्य या कार्यक्रमात आपली कला पेश करतात. यावर्षी झालेल्या स्वरयज्ञात सुमारे २४ कलाकारांनी आपली कला सादर केली. या कार्यक्रमात सकाळ दुपार संध्याकाळ व रात्र अशा सर्व वेळांचे राग रसिकांना ऐकायला मिळाले.

भूप, मियाँ मल्हार, भीमपलास, नटभैरव, मियाँकी तोडी या आणि अशा अनेक रागांचा आस्वाद रसिकांनी यावेळी घेतला. इयत्ता ९ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यापासून ८६ वर्षांच्या कलाकारांनी आपली कला यात सादर केली.

सुभाष कीर्तने, अपर्णा बिवलकर, अंजली दाणी, शर्वरी पुरोहित, वैभव दवे, डॉ.शशांक लिमये, महेश राव, अंजली मालकर, परिमल कोल्हटकर, ब्रिकेश गांगुर्डे, मकरंद सरपोतदार, मकरंद खरवंडीकर, शौनक कुलकर्णी, पवन श्रीकांत नाईक, समीर बिल्डीकर, सोनाली तांबे, नचिकेत रावीवीकर, मानसी जोशी, संपदा भालेराव, गौरव चंदा, चेतन अनंत, आदित्य गायकी, आकाश गायकी, वीणा वाटवे आणि स्वतः पं.विकास कशाळकर यांनी निरनिराळ्या राग सादरीकरणातून रसिक मने जिंकली.

डॉ.कशाळकर यांच्या गायनाने मैफलीवर कळस चढला. या कलाकारांना अंजली दाणी, कल्याण मुरकुटे, शेखर दरवडे, ब्रिषेकेश सुरवसे, दिपीन दास, प्रसाद सुवर्णपाठकी आणि सुपर्ण प्रताप यांनी साथसंगत केली. माणिक देव यांनी सूत्रसंचालन केले. या प्रसंगी गुंजारव या संस्कृत त्रैमासिकाचे प्रकाशन डॉ.कशाळकर, सी.ए.अशोक गुर्जर, चारुहास कोल्हापुरे, रेणुका मुळे, होशिंग यांच्या हस्ते झाले. त्याचप्रमाणे गांधर्व मंडळाच्या विविध संगीत परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.धनश्री खरवंडीकर, संतोष खोह्लम, मोहिनी खोह्लम, पुष्पा औटी, दीप्ती खरवंडीकर, वेदांत कुलकर्णी, रिद्धी कुलकर्णी इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला रजिस्ट्रार अशोक असेरी, सविता काळे, रेवणनाथ भनगडे, कुमुदिनी बोपर्डीकर, ॲड. आनंद कुलकर्णी, अभय जोशी, अद्वैत कुलकर्णी, संपदा चौधरी, श्रीकांत नाईक, ॲड.गौरव मिरीकर, भणगे, प्रसाद बेडेकर तसेच नगरमधील संगीत रसिक, संगीत शिक्षक आणि संगीत शिकणारे विद्यार्थी उपस्थित होते.

खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात फरार आरोपीस साताऱ्यात ठोकल्या बेड्या

शेंडी बायपासला पैशाच्या वादातून केले होते एकावर चाकूने वार

नगर – शेंडी बायपास रोडवर १५ एप्रिल रोजी रात्री पैशाच्या वादातून अशोक श्रीधर शेळके या व्यक्तीवर चाकूने वार करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करणारा निखिल शिवाजी गांगर्डे (वय २६, रा. दत्तनगर, वडगाव गुप्ता ता.नगर) यास एमआयडीसी पोलसांनी सातारा जिल्ह्यातुन शिताफिने पकडुन जेरबंद केले आहे.

खुनाचा प्रयत्न गुन्ह्यात फरार आरोपीस साताऱ्यातून पकडून आणल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

याबाबत जखमी अशोक शेळके यांचा मुलगा तुषार शेळके याने फिर्याद दिली होती. या घटने नंतर आरोपी फरार झाला होता. एमआयडीसी पोलिस ठाण्याचे स.पो.नि. माणिक चौधरी यांनी पोलिसांचे एक पथक त्याच्या शोधासाठी नेमलेले होते. तपास सुरु असताना आरोपी निखील गांगर्डे हा सातारा येथे असल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथक तातडीने रवाना झाले. या पथकाने आरोपीस सातारा जिल्ह्यातील साकुर्डी (ता. कराड) येथे शिताफीने पकडले.

सदरची कारवाई स.पो.नि. माणिक चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. नंदकिशोर सांगळे, राजु सुद्रिक, नितीन उगलमुगले, पो.ना. विष्णु भागवत, पो.कॉ.किशोर जाधव,नवनाथ दहिफळे, तसेच मोबाईल सेल पो.कॉ.राहुल गुंडु यांचे पथकाने केली.

हद्दपारी आदेशाचा भंग करून केडगावात आलेल्या आरोपीला पोलिसांनी केले जेरबंद

नगर – नगर शहरासह जिल्ह्यातून २ वर्षाकरिता हद्दपार करण्यात आलेले असतानाही या आदेशाचा भंग करून केडगाव मध्ये आलेल्या आरोपीला कोतवाली पोलिसांच्या पथकाने जेरबंद केले आहे. आकाश अशोक पवार (वय २७, रा. केडगाव) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

आकाश पवार याला नगरच्या प्रांताधिकाऱ्यांनी २ वर्षाकरिता जिल्ह्यातून हद्दपार केलेले आहे. असे असताना तो केडगाव मध्ये आला असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून केडगाव मधील तलाठी कार्यालयाजवळील पाण्याच्या टाकी जवळ त्याला शनिवारी (दि.२२) रात्री ११.३० च्या सुमारास पकडले.

त्याच्यावर पो.कॉ.सुरज कदम यांच्या फिर्यादी वरून महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये योग व संगीत दिवस साजरा

नगर – पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस व संगीत दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना योग व प्राणायामाचे धडे देऊन त्याचे महत्त्व सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील योगाचे विविध आसने उत्तमपणे सादर केले. योगशास्त्र अभ्यासक चंद्रशेखर सप्तर्षी, योग प्रशिक्षक पूजा ठमके व पोदार स्कूल (पुणे) रिजनल टू चे जनरल मॅनेजर मनोज काळे उपस्थित होते.

पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये योग दिवस व संगीत दिवस प्रसंगी योग प्राणायामचे धडे देताना योग प्रशिक्षक पूजा ठमके. दुसऱ्या छायाचित्रात योगाचे धडे शिखताना विद्यार्थी–विद्यार्थिनी.

चंद्रशेखर सप्तर्षी म्हणाले की, योगाभ्यास हा भारताच्या इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. योग–प्राणायामाने मन एकाग्र होते. यामुळे खेळात व अभ्यासात एकाग्रता निर्माण होऊन विद्यार्थ्यांची प्रगती साधली जात असल्याचे सांगितले.

पूजा ठमके यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थ्यांकडून प्राणायाम, अनुलोम–विलोम, वृक्षासन, ताडासन, त्रिकोणासन, हस्त पादासन, सूर्यनमस्कार अशी विविध आसने करून घेतली.

शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप म्हणाले की, योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते. मुलांची सर्वांगीन प्रगती होते. मानवी जीवनात व्यायाम व योगाचे अन्ययसाधारण महत्त्व आहे. ज्यामुळे सकारात्मक विचारांचा प्रवाह निर्माण होतो व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. फक्त एक दिवस योगासने न करता योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचे आवाहन केले.

२१ जून हा संगीत दिवसही शाळेत साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या गाण्यातून, स्वरातून शाळेत स्वरांची मैफल सजली होती. विविध प्रकारच्या भाषेतील गाणी व वाद्य याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केली.

संगीत शिक्षक मनोज बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली वादन व गायनाद्वारे ऑर्केस्ट्राचे सादरीकरण करण्यात आले.

यावेळी पोदार इंटरनॅशनल स्कूलचा आठवा वर्धापन दिन ही साजरा करण्यात आला. शाळेच्या स्थापनेपासूनच्या जुन्या आठवणीना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूरजहाँ शेख यांनी केले. आभार पूनम जाधव यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पाहिजेत
कॉस्मेटिक दुकानात बिले व लिखाण करण्यासाठी
जागा : १
जेन्टस्/लेडीज
लिखाणाचा अनुभव आवश्यक
जय बाबा कॉस्मेटिक
9623685787

ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत
विगेन इंडिया कंपनीच्या अहमदनगर ब्रँचमध्ये ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत.
शिक्षण : १२ वी ते पदवीधर
9604609130

आचारी पाहिजे
नगरमधील इंद्रायणी चौकात प्रहार ॲकेडमी येथे आचारी हॉटेलमध्ये वडे, भजे, मिसळ, चहा, नाश्ता तयार करण्यासाठी अनुभवी आचारी व वेटर पाहिजेत
मो.8380810070

पाहिजेत
नगर शहरात फ्लिपकार्टमध्ये डिलेव्हरी बॉय पाहिजे, जॉब करण्याची सुवर्णसंधी, ५ ते ६ तास काम, कमवा १५ ते २२ हजार रु.
अर्जुन सानप
7391990045
9763544572

डिसोजा क्लासेस
Since:1978
Nursery, L.K.G., U.K.G., 1st, 2nd, 3rd, 4th, 5th, 6th, 7th, 8th, 9th, 10th,
SCIENCE 11 वी, 12 वी, MATHS
COMMERCE 11 वी, 12 वी, F.Y., S.Y., T.Y., B.COM
BBA MBA स्पोकन इंग्लिश
Mob.No.: 9325345673 / 7219528874

भाडे तत्वावर देणे
दाळमंडई रोडटच,विठ्ठल मंदिरासमोर,३०० स्क्वे.फूट दुकान भाडेतत्वावर देणे.
प्रकाश बा.म्हस्के
9420747563

हॉल भाड्याने देणे

तपोवन रोड, थ्रीडी कॉर्नर रोडटच, सावेडी येथे २५०० स्क्वे.फूट, दोन हॉल, क्लासेस, आयटी सेंटर, बँक, पतसंस्था, ऑफिस, फायनान्स कंपनी, कपड्याचे सेलकरिता उपयुक्त भाड्याने देणे आहे.
9370476262

महिला फार्मासिस्ट पाहिजे
प्रत्यक्ष येऊन भेटावे.
पत्ता : सार्थक हॉस्पिटल, बुरुडगाव रोड, अ.नगर
9421607024

सेल्समन पाहिजेत
राजेंद्र होम डेकोर या शोरूमकरिता
सेल्समन
महिला : ४ / पुरुष : २
एचडीएफसी बँकेशेजारी, सर्जेपुरारोड,लालटाकी, अ.नगर
9822799991

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर
सामान्यापासी ₹500/- | ऑपरेशन हालिल्ली ₹9000/- | फिक्चर हालिल्ली ₹19000/-
प्रसुतिगृह | सी रोग | बंधमुक्त निवारण | लेप्रोस्कोपी | शासनमान्य गर्भपात केंद्र
जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

क्लासेससाठी हॉल भाड्याने देणे आहे.
धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदधाम परिसरात क्लासेससाठी उपयुक्त असे दोन हॉल भाड्याने देणे आहेत. कॉलेज, इंजिनिअरींगला प्राधान्य.
8237110544

अ.नगर कापड बाजार येथे शॉप्स उपलब्ध
ऑफर मर्यादित कालावधीसाठी, सर्व सुविधायुक्त, सी.सी. टिव्ही, कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वॉशरूमची सुविधा
अशा व्यवसायाची सुवर्ण संधी पुन्हा नाही
9270570699

त्वरित पाहिजेत
रेडिमेड होलसेल कापड दुकानाकरिता
कॉम्प्युटर ऑपरेटर : ३
अकौंटंट : २
सेल्समन : ५
सेल्सगर्ल : ५
अनुभवीना प्राधान्य
हेल्पर (मुले/मुली) : ५
गारवी गारमेंटस्, कैलास डेअरीसमोर खिस्तगल्ली, अहमदनगर
9970799111, 9764111117

Green Library
EARTH's Greenery for Every Space
Get a Plant Today!
- Potted Planters
- Premium Planters
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Fresh Environment with Indoor Plants
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

विकणे आहे
Scoda Superb
Top End Model 2010
शहराच्या मध्य वस्तीत ४४० स्के.फू. हॉल तसेच ५५० स्के.फू. चे ३ रुम व बेसमेंट विकणे आहे
संपर्क
9022510584

डोंगरे कोचिंग क्लासेस
लातूर पॅटर्न
प्रवेश सुरु
वर्ग ६ वी ते ९ वी आणि ११ वी + CBSE स्पेशल बॅच प्रवेश सुरू
वर्ग ६ वी \ सायन्स । मॅथ्स । इंग्रजी
वर्ग १० वी \ सायन्स । मॅथ्स
वर्ग ११ वी \ फिजिक्स । केमिस्ट्री
NEET | MHTCET बॅच
सर्वांकृष्ट गुणवत्तेचा पाया रचणारा क्लास
क्लासची वैशिष्ट्ये
- स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण करणारा क्लास
- दररोज 2 तास क्लास
- प्रत्येक विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढवण्यावर भर
- स्वलिखित प्रिंटेड नोट्स
- भरपूर सराव, मर्यादित विद्यार्थी संख्या व डिजिटल क्लासरूम
संपर्क
सौ. प्राजक्ता डोंगरे (B.A. Eng., L.LB)
पिंतामणी हॉस्पिटल जवळ, बोरुके मळा, अहमदनगर. मो. 9423742430

बजाज वॉटरप्रुफिंग कं.
जर्मन टेक्नॉलॉजी
गोडफोड न करता ५ वर्षांच्या लेखी गॅरंटीसह केमिकल वॉटरप्रुफिंग स्लॅब, बाल्कनी, वाशरूम, फग्यांची टाकी ई.
9096291653

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे
तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

बाळ आजारी आहे का?
- ते वारंवार आजारी असणे
- नेहमी सर्दी, खोकला
- वारंवार होणारा बाल दमा
- वारंवार जुलाब होणे
- प्रतिकारशक्ती कमी असणे
- वजन, उंची कमी

या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

आज सोमवार | रात्री ९.३० वा. | सहकार सभागृह, अ.नगर
संकर्षण कऱ्हाडे | स्पृहा जोशी
संकर्षण VIA स्पृहा
सहकाऱ्यांच्या साथीने: अजय जोशी, विनय येडेकर
दुसऱ्या दिवशी बाप्पा
निखळ मनोरंजनाचा हलका फुलका प्रयोग!
Online Booking ticketalay | bookmyshow
संकर्षण कऱ्हाडे व स्पृहा जोशी
ति.वि. दिवसभर सहकार सभागृहावर सुरू.
फोन बुकिंग संपर्क संदीप अडगटला-7390039191
प्रसाद दाणेकर यांचे 'चौरी चिपडणे' प्रस्तुत
प्रसाद दाणेकर यांचा 'फकाकेश' सादरीकरण

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज
9% व्याजदर
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
7888219471, 9423167850
बागडपट्टी, अहमदनगर
शुन्य टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा ₹ 58000

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
सर्व शालेय विद्यार्थ्यांचे आणि लेडीजचे रेनकोट मिळतील.
झील आणि वर्षा रेनकोट वर 20% डिस्काउंट
लेडीज कुर्ती पँट सेट सरसकट 20% डिस्काउंट
फॅन्सी क्रेप साडी 999/- रु. मधे 5 साड्या
भारी किंग साईझ बेडशीट वर 15% डिस्काउंट.*
वेगळ्या ठिकाणी आले तरच वेगळेपण पाहायला मिळेल..
अधिक माहितीसाठी भेट द्या.. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातून
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xcent / WagonR / Dzire
प्रत्येक वेळेस गिरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -पिंपळगाव फाटा, झोपडी कॅन्टीन, तारकपूर,रिक्षिंग, राज सेलेरा बॉक,सपनींग बॉक,केडगाव
पुणे ड्रॉप- वाघोली, खराडी बायपास,वेलकाम, नवीन सिंहगॉनगर स्वरूपॅन्क, कुकिंग-आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज ऑफिस- पिंपळरोड,अ.नगर 9657746555/ 9226399555

सरकारमान्य संस्था घरबसल्या रोज ५०० ते १००० रु. कमवा
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा.. माल फ्री घरपोहोच
धनश्री उद्योग
अंबर प्लाझा बेसमेंट, नगो मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

१२ वे पुण्यस्मरण
स्व. मुरलीधर धरमदास आहुजा
स्व. दि. २४/६/२०१२
कदम कदम पर आयेगी याद, आपकी प्रेरणा आपकी हर बात. सफर हो जिवना भी मुश्किल आपका आशीर्वाद रहेंगा हमारे साथ...!
आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली...
सुनिता ड्रेसेस
समस्त आहुजा परिवार

२१ जुलै २०२४ अयोध्या दर्शन यात्रा
काशी विश्वेश्वर, प्रयागराज, नया त्रिवेणी बाजा
प्रवास : १० दिवस
प्रेक्षणीय स्थळे
उज्जैन, अयोध्या, प्रयागराज, स्था. वाराणसी, त्रिवेणी, सती अनुसया, गुल गोदावरी, ओंकारेश्वर, शेगाव
प्रतिव्यक्ती ₹ 11601/-
2 x 2 आरामदायी स्लीपर कोच बसने प्रवास, निवास व भोजनासह
श्री सुविधा यात्रा करणी संचालित
AMAR PREM Holidays & Multiple services
रेल्वे आरक्षण - श्री. रमेश रामभरत मुरारी, श्री. सतिश सदाशिव मुरारी, मो. ९२२६१९१९१ / ९४२३१६७८५० सुनिल मेडिकल, त्रिमुर्ती, अ.नगर.
पुणे आरक्षण - श्री. सतिश चंद्रप्रकाश बोडखे, श्री. विनायक सोपानराव बोडखे, मो. ९२२६३९९९९ / ९२२१४४४९९ संतोषिमा, निवास पुणे - ११
नाशिक आरक्षण - श्री. रमेश रामभरत मुरारी, मो. ९८२२६१९१९१ / ९८२२१४४९९९ सौ. ए. व. गोपाल हॉ., अशोका स्टाइलिश मार्ग, नाशिकरोड, नाशिक
नागपूर आरक्षण - श्री. सुनिल प्रल्हाद बोडखे, मो. ९८२२६२९१९१ सौ. ए. व. गोपाल हॉ., अशोका स्टाइलिश मार्ग, नागपूर, नागपूर

Career Academy DISHA
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA
Diploma Course in Graphics & Office Automation
GET READY FOR YOUR JOB
JUST IN 8900/-
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST
CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP
WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supkar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maharaja Stand, Station Road, A.nagar — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769

कोहिनूर सेल
Follow @kohinoorahmednagar
सबा सर्वांचा सर्वांसाठी सर्वांतम कपडे
कोहिनूर®
SALE
सेल
खरेदीवर मिळवा 50%* पर्यंत डिस्काउंट
T&C Apply*
www.cinevoice.co.in
एम.जी. रोड | कोहिनूर मॉल, सावेडी
अहिल्यानगर